
# बाल-नागरिक




म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा· ना·
बा. क्र. १

४

केशव भिकाजी ढवळे
समर्थ-सदन
गिरगाव मुंबई

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें नागरिकशास्त्रावरील पुस्तकें

# बाल-नागरिक

## पुस्तक चौथें

[ चौथ्या इयत्तेसाठीं ]


लेखक

प्रा. केशव गोपाळ पंडित, एम्. ए.

कीर्ति कॉलेज, मुंबई



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

वा. क्र. ९६६३८ नों. दि १०.८.१.५६

वि. ........ आ. वा ........ ..................



केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ-सदन

गिरगांव, मुंबई


मूल्य ६० पैसे

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९४३
पुनर्मुद्रण : १९४३, १९४४,
१९४५, १९४७, १९५०,
१९५१, १९५२, १९६२,
१९६४

मुद्रक : राजाराम बळवंत देशमुख, मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१, सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई ४
प्रकाशक : श्री. बा. ढवळे, केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई ४

# दोन शब्द

प्राथमिक शाळांसाठीं शिक्षणखात्यानें सुधारून तयार केलेल्या नवीन अभ्यासक्रमांत ‘ नागरिक-शास्त्र ’ ह्या एका नवीन विषयाचा समावेश केला आहे. ह्या अभ्यासक्रमाला धरून ‘ बाल-नागरिक ’, पुस्तक पहिलें, दुसरें, तिसरें व चौथें, हीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

प्रत्येक पुस्तकांत त्या त्या इयत्तेसाठीं नेमलेल्या भागांतील प्रत्येक पोटविषयावर एकेक धडा लिहिला आहे. विषयाची मांडणी, भाषा हीं त्या त्या इयत्तेंतील मुलांना समजेल अशा तऱ्हेनें केली आहे. विशेष गोष्ट ही कीं सर्व विषयांचें विवेचन गोष्टीरूपानें अथवा प्रसंगपद्धतीनें केलेलें आहे. लहान मुलांच्या बाबतींत ही पद्धति किती यशस्वी ठरते हें नव्यानें सांगण्याची जरूर नाहीं. प्रत्येक धड्याच्या शेवटीं उजळणीवजा प्रश्नही घातले आहेत. शिक्षकांना व मुलांना त्यांचा पुष्कळ उपयोग होईल. शास्त्रीय विषयाच्या अभ्यासांत माहितीपेक्षां [ Theory ] कृतीला [ Experiment ] अधिक महत्त्व आहे, हें ओळखून दिलेलें नागरिक-शिक्षण मुलांच्या प्रत्यक्ष आचरणांत येत आहे, इकडे शिक्षक विशेष लक्ष देतील अशी आशा आहे.

‘ नागरिक-शास्त्र ’ हा शब्द नवा असला, तरी विषय जुनाच आहे. समाजाची कल्पना अस्तित्वांत आली, त्याच वेळीं नागरिकशास्त्राचा जन्म झाला असें म्हटलें पाहिजे. सर्व शिक्षणाचें ध्येय आदर्श नागरिक तयार करणें हें होय, असें म्हटलें आहे व तें खरें आहे. नवीन अभ्यासक्रमांत नागरिकशास्त्राला स्थान मिळालें, हें योग्यच झालें. नागरिकत्वाला लागणाऱ्या सर्व गुणांची वाढ लहानपणापासूनच होत असते व म्हणूनच नागरिक शिक्षणाचा आरंभ लहान वयांत होणें हें इष्ट आहे. लहान मुलें हीं ‘ बाल-नागरिक ’ होत.

हीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याच्या कामीं नवीन मराठी शाळेचे अनुभवी हेडमास्तर रा. शि. कृ. देशपांडे यांनीं केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

के. गो. पंडित

फर्गसन कॉलेज, पुणें ४
वर्षप्रतिपदा ता. ५।४।४२

# अनुक्रमणिका

## समाजाचा अभ्यास


१. खेड्याचा कारभार : ग्रामपंचायत ... ... ... ५
२. खेड्यांतील नागरिक सुखसोयी ... ... ... १०
३. शहरचा कारभार : म्युनिसिपालिटी ... ... ... १६
४. शहरांतील नागरिक सुखसोयी ... ... ... २३


## प्रात्यक्षिक कामें


५. शालेय पंचायतींची संघटना ... ... ... २९
६. भोवतालच्या भागाची स्वच्छता व संरक्षण ... ... ३५
७. लहान मुलांसाठीं खेळ व करमणुकीची योजना ... ... ३९
८. मुलें आणि प्रौढ लोकांच्या करमणुकीची संघटना... ... ४४
९. राष्ट्रीय आणि हंगामी उत्सवांत भाग घेणें ... ... ४९
१०. यात्रा आणि उत्सवांत स्वयंसेवकांचें काम ... ... ५६
११. नागरिक आणि नागरिकशास्त्र ... ... ... ६१

वा. क्र. २६६३४ नों. दि. ९८/८/५६
वि. बा. बा.


# १ खेड्याचा कारभार : ग्रामपंचायत

शाळेला तसेंच सरकारी कचेरीला मे महिनाभर उन्हाळ्याची सुट्टी होती. घरांतली लहान थोर सर्व मंडळी हवापालट म्हणून आपल्या खेडेगांवीं चार दिवस राहाण्यासाठीं आली. मुलांच्या आईवडिलांचा हा दरवर्षीचाच कार्यक्रम ! शहरांतल्या गजबजाटांतून खेडेगांवांतल्या मोकळ्या हवेंत आल्यानें सर्वांनाच थोडे दिवस फार समाधान वाटे. त्याचप्रमाणें घरची थोडी शेतवाडी व जमीनजुमला असल्यामुळें चार दिवस विश्रांतीसाठीं आलेल्या या दिवसांत सहजासहजीं कुळांच्या कबुलायतीचे, खंडाचे व सरकारी साऱ्याधाऱ्याचे व्यवहारही नीटपणें करतां येत असत. आंबे, गरे यांची रेलचेल व दिवसभर खेळायला मोकळीक असल्यामुळें मुलांच्या आनंदाला तर पारावारच नाहीं. पोटभर खायचें आणि गांवभर फिरायचें हा रोजचा कार्यक्रम !

मंडळी आपल्या गांवाला येऊन चार सहा दिवस झाले होते. मुलांच्या वडिलांनीं साऱ्याधाऱ्याचा हिशेब करण्यासाठीं गांवच्या तलाठ्यास बोलावणें पाठविलें होतें. एके दिवशीं संध्याकाळीं तलाठी दप्तर व पावती-पुस्तक घेऊन आले. त्यांनीं सर्व्हे नंबर पाहिले. सूट वजा जातां त्यांनीं एकशेंपंचवीस रुपयांचा आंकडा सांगितला. वडिलांनीं हिशेब तपासला व रक्कम देऊन पावती घेतली. तलाठी गेल्यावर मुलांनीं वडिलांना विचारलें, " बाबा, यांना तलाठी कां म्हणतात हो ? आणि त्यांनीं पैसे हो कसले नेले ? "

**बाबा :** हे एक येथील अधिकारी आहेत. यांना आपल्या इकडे तलाठी, कांहीं ठिकाणीं पटवारी, कांहीं ठिकाणीं कुलकर्णी, दक्षिणेंत तल्यारी, असें म्हणतात. यांची नेमणूक सरकार करीत असतें. तलाठ्याचीं

मुख्य कामें म्हणजे गांवांतील जमिनींचे व शेतांचे नकाशे आपल्या दप्तरीं बाळगणें, त्यांच्या कायदेशीर मालकीची नोंद करणें, खरेदीविक्रीच्या वेळीं एकाची जमीन दुसऱ्याच्या नांवावर चढविणें, निरनिराळ्या जमिनींची पिकाप्रमाणें वर्गवारी करणें व उत्पन्नाची नोंद ठेवणें आणि साऱ्या-धाऱ्याचा हिशेब करून त्यांची वसुली करणें.



मगाशीं त्यांनीं आपला धाऱ्याचा हिशेब नेला. धारा वर्षाचा असतो. तलाठी तो जमा करतो व सगळी जमा सरकारी खजिन्यांत नेऊन भरतो.

**मुलें** : बाबा, जर कोणीं धारा वेळेवर भरला नाहीं, तर तलाठी काय करतात हो !

**बाबा** : तलाठी त्या माणसाला नोटीस देतो. दिलेल्या मुदतींत पैसे भरले नाहींत, तर तलाठी वर मामलेदाराकडे त्याची माहिती देतो. मामले-दाराच्या हुकुमानें तलाठी बेलीफाच्या मदतीनें घरावर जप्ती काढूं शकतो व असेल नसेल त्याचा लिलाव करून धाऱ्याची रक्कम वसूल करूं शकतो.

दुपारच्या जेवणानंतर सर्व मंडळी अंगणांत गोष्टी करीत बसली होती मुलें खेळत होतीं. तेवढ्यांत गांवचा पाटील तेथें आला.

“या पाटील, भर दुपारींच इकडे कोणीकडे ?” वडिलांनीं विचारलें

“खालच्या आळींत त्या सोनाराच्या घरीं चोरी झाली, तेथें पंचनामा करण्यासाठीं गेलों होतों. जातां जातां आपल्याला पाहिलं म्हणून आंत चढलों.”

**मुलें :** बाबा, पंचनामा म्हणजे काय हो ?

**पाटील :** मुलें फार हुशार आहेत !

**वडील :** तर, त्यांना सगळ्या चौकशा ! पंच म्हणजे पांच, नाम म्हणजे नांवें ! ‘पंचनामा’ म्हणजे जेथें एकादा गुन्हा घडला असेल तेथें गांवांतील पांच प्रतिष्ठित माणसांसमक्ष त्याची चौकशी करून नोंद करणें व ती बरोबर असल्याबद्दल त्यांच्या साक्षी म्हणून सह्या घेणें. गुन्ह्याची पहिली चौकशी करणें हें गांवच्या पाटलाचें काम आहे.

**मुलें :** तलाठी तसेच पाटील हेही गांवचे अधिकारी का हो ?

**वडील :** होय ! तलाठी व पाटील हे खेडेगांवांतील दोन मुख्य अधिकारी. पाटलाचा मान व महत्त्व गांवांत फारच मोठें असतें. पाटील म्हणजे गांवचा राजाच. पाटलाचा अधिकार फार मोठा आहे. त्याचें कामही फार जबाबदारीचें असतें. गांवांत शांतता राखणें, गुन्हा घडल्यास त्याची चौकशी व नोंद करणें, पोलिसठाण्यावर त्याची ताबडतोब वर्दी देणें, गुन्हेगाराचा तपास करण्याच्या कामीं पोलिसांना लागेल ती मदत करणें, गांवांतील जन्ममृत्यूंची नोंद ठेवणें व दौऱ्यावर–फिरतीवर–आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांची व्यवस्था-ठेवणें हीं सगळीं पाटलाचीं कामें असतात. पाटील हाच गांवचा सर्वांत मोठा अधिकारी.

खरंच पाटील, यंदा गांवांतल्या रस्त्याची थोडी दुरुस्ती व्हायला पाहिजे आहे. गेल्या वर्षी ठरल्याप्रमाणें विहीर बांधायची होती तीही झाली नाहीं. ग्रामपंचायतीची व्यवस्था अशी कां ?

**पाटील :** आजच रात्रीं सभा आहे पंचायतीची ! पुष्कळ निरनिराळे तक्रारी अर्ज आले आहेत. सर्वांचा विचार आज व्हावयाचें ठरलें आहे. चालू सालीं बरीच सुधारणा होईल असा अंदाज आहे.

**मुलें :** बाबा, ही ग्रामपंचायत म्हणजे काय ? व ती कशासाठीं असते ?

**वडील :** गांवची व्यवस्था नीट राहावी यासाठीं गांवांतले लोक सांत अथवा अधिक जणांची एक कमिटी निवडून देतात तिला ग्रामपंचायत म्हणतात. ग्राम म्हणजे गांव व पंचायत म्हणजे पंचांची म्हणजे प्रमुख लोकांची कमिटी. गांवांतील ह्या प्रमुख लोकांचा शब्द म्हणजे परमेश्वराचा शब्द. ते सांगतील तें खरें व ते देतील तो न्याय ! गांवचे मायबाप, देव ! लोकांच्या विश्वासांतले. लोक त्यांना आपल्या मतांनीं निवडून देतात. तलाठी व पाटील यांना सरकारकडून अधिकार मिळतो. पंचायतीला अधिकार लोकांकडून मिळतो. पंचांचा मुख्य असतो, त्यास सरपंच म्हणतात.

खेड्याचा सर्व कारभार पंचायतीमार्फत चालतो. गांवांत स्वच्छता ठेवणें, विहिरी व तलाव खणून पाणीपुरवठ्याची सोय करणें, गांवांतील सार्वजनिक इमारती, बाजार, चावडी, दवाखाना व रस्ते तयार करणें आणि दुरुस्त करणें, स्वच्छता व आरोग्य यांकडे लक्ष देणें, गांवांतील जमिनींच्या हद्दींबाबत तंट्याच्या, मारामारीच्या, भांडणाच्या साऱ्या तक्रारी व किरकोळ खटले ऐकण आणि निवाडा करणें हीं ग्रामपंचायतींचीं कामें आहेत. खेड्याच्या मानानें पाहातां त्यांचे अधिकारही अगदीं लहान नाहींत.

अपराध्यास थोडाबहुत दंड करण्याचा अधिकार त्यांना आहे. कैदेची शिक्षा त्यांना करतां येत नाहीं. आपल्या देशांत शहरांच्या मानानें खेडींच पुष्कळ आहेत व मोठमोठ्या खेड्यांतील कारभार अशा तऱ्हेनें चालतो.

पंचायत ही लोकसंस्था असल्याकारणानें सर्व लोकांचा तिच्यावर विश्वास असतो व तिजविषयीं सर्वांना आपलेपणा वाटतो. तिच्या स्थापनेमुळें लोकांना आपल्या गांवच्या कारभारांत लक्ष घालावेसें वाटूं लागतें व तसें करण्यास त्यांना संधीही मिळते. सरकारी अधिकाऱ्यांवर अवलंबून राहाण्याची सवय मोडून स्वावलंबी बनण्याची व समाजसेवा करण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न होते. परस्परांत स्नेह व जातीजातींत सलोखा वाढतो. एकमेकांस साह्य करण्याची वृत्ति निर्माण होते. दावे लवकर निकालांत निघतात; तक्रारी थोड्या वेळांत दूर होतात.. कोर्ट-कचेऱ्या कराव्या न लागल्यानें वेळ व पैसा वांचतो. लोकांची एकी होते व गांवाची सुधारणा होते.

आपल्या देशांत आतां स्वराज्य आहे. स्वराज्य म्हणजे आपलें राज्य, आपल्या लोकांचें राज्य, लोकांच्या पुढाऱ्यांचें अथवा प्रतिनिधींचें राज्य. ग्रामपंचायत हा स्वराज्याचा पहिला धडा अथवा श्रीगणेशा होय !

---

**अभ्यास :** ( १ ) तलाठी हा सरकारी नोकर का बिनसरकारी ? त्याचीं कामें काय ? ( २ ) 'पाटील हा गांवचा राजा' हें कसें तें सांगा. ( ३ ) पाटलांचीं कामें काय ? ( ४ ) ग्रामपंचायत म्हणजे काय ? ( ५ ) ग्रामपंचायत कोण बनवितें व तिचीं कामें काय ? ( ६ ) ग्रामपंचायतीचे समाजाला काय फायदे आहेत ? ( ७ ) 'ग्रामपंचायत हा स्वराज्याचा श्रीगणेशा होय' ह्या वाक्याचा अर्थ सांगा.

## २. खेड्यांतील नागरिक सुखसोयी

सुट्टींत गांवीं येतांना मुलांच्या आईवडिलांनीं शहराहून गहूं, लोणी, अशा खेडेगांवीं विशेष न मिळणाऱ्या वस्तु आणल्याच होत्या. बाकी रोज लागणाऱ्या वस्तु तेथल्या तेथेंच घेण्याचा त्यांचा शिरस्ता असे. तांदूळ घरच्याच शेतांतला होता. परंतु थोड्याच दिवसांत जोंधळा, बाजरी, मूग, मटकी, मीठ, मिरची हीं आणण्याची वेळ आली. तेव्हां वडिलांनीं घरच्या गड्याला हाक मारून विचारलें,

" गणू, गांवचा बाजार कोणत्या दिवशी आहे ?

**गणू** : सोमवारीं.

**वडील** : मग त्या दिवशीं बाजाराला जा आणि बाईंना विचारून ज्या कांहीं वस्तु हव्या असतील त्या घेऊन ये. मुलांना घेऊन जा बरोबर, म्हणजे खेडेगांवचा बाजार कसा असतो तें तीं बघतील.

**मुलें** : आम्ही जाऊं गणूबरोबर आनंदानें. पण बाबा, खेडेगांवांत शहरासारखी मंडई अथवा बाजारपेठ नसते का हो !

**वडील** : खेडेगांवांत बाजारपेठ अथवा मंडई अशी नसते. त्यांतल्या-त्यांत एखाद्या मोठ्या खेडेगांवीं एका मोकळ्या व मोठ्या जागेंत आठवड्यांतून एका दिवशीं बाजार भरतो. त्या दिवशीं आजूबाजूच्या खेडेगांवचे लोक तेथें बाजार करण्यासाठीं येतात व आठवड्याचें सामान घेऊन जातात. आजूबाजूच्या गांवांतले धंदेवाले आपला माल तेथें आणून विकतात. धान्याचा बाजार असतो, तसाच गुरांचाही बाजार असतो. धान्याच्या बाजारांत धान्य, मीठमिरची, भाजीपाला, किरकोळ फळफळावळ या वस्तु मिळतात. गुरांच्या बाजारांत गुरांची खरेदीविक्री चालते. आपल्या गांवाबाहेर हा बाजार दर सोमवारीं भरतो. तुम्ही जाऊन पाहा.

शहराच्या मानानें तो फार लहान असतो, परंतु खेडेगांवांतील लोकांना जरुरीपुरत्या वस्तु मिळण्याची तेथें सोय होते.

थोड्या वेळानें गांवांतील पोस्टाच्या जासुदानें पत्रें आणून दिलीं. त्याची ती काठी आणि पिशवी बघून मुलांनीं विचारलें,


"बाबा, खेडेगांवचा पोस्टमन असा काय हो? आणि येथील पोस्टसुद्धा किती लहान आहे. तेथें ताराबिरा कांहीं नाहींत."

**वडील :** खेडेगांवांत तारऑफिस कोठून असणार? इकडल्या लोकांना त्याची एवढी जरुरी नसते. त्यांना एकादे वेळीं तार करायची झाली, तर जवळच्या तालुक्याच्या ठिकाणीं जाऊन ती त्यांना करावी लागते. परंतु साधीं पत्रें व मनीऑर्डरी पाठविण्याची व मिळण्याची सोय खेडेगांवीं केलेली असते. तिकिटें, कार्डें, पाकिटें येथें मिळूं शकतात. हीसुद्धा खेडेगांवांतील लोकांसाठीं मोठीच सोय आहे. तसेंच पोस्टाची व्यवस्था करणें हें खर्चाचें काम असल्याकारणानें एका मोठ्या खेडेगांवांतलें पोस्ट आजूबाजूच्या खेडेगांवांना लागू करण्यांत येतें. तालुक्याच्या ठिकाणीं आगगाडीनें, आगबोटीनें किंवा मोटारीनें पत्रें येतात व तीं खेडेगांवच्या लहान लहान पोस्टांकडे रवाना करण्यांत येतात. तेथून पोस्टमन घरोघर पत्रें पोचवितो. शहराइतकी उत्तम नसली, तरी खेडेगांवांतल्या लोकांच्या गरजा भागविण्याइतकी ही पोस्टाची व्यवस्था पुरेशी असते.

दोन प्रहरीं कांहीं गुरें येऊन त्यांनीं घराच्या मागच्या शेतांत नासधूस सुरू केली. मुलें त्यांच्या मागें धावलीं, परंतु गुरें त्यांना थोडीच दाद देतात! गणू त्यांना हाकण्यासाठीं शेतांत काठी घेऊन गेला. मुलांचे वडील बाहेर आले व त्यांनीं विचारलें,

"गणू, कोणाचीं रे हीं गुरें?"

**गणू :** त्या नाक्यावरच्या महाराचीं, रोज येऊन असा त्रास देतात, शेत खातात आणि नासधूस करतात. किती वेळा सांगितलं तरी तो ऐकत नाहीं.


कोंडवाडा

**वडील :** असं ? तर मग त्यांना हाकलूं नको. त्यांना पकड आणि कोंडवाड्यांत नेऊन घाल, म्हणजे त्या महाराला कळेल. दंड झाल्याशिवाय तो धडा घेणार नाहीं ! धर जा त्यांना !

**मुलें :** बाबा, कोंडवाडा म्हणजे काय हो ?

**वडील :** म्हणजे ज्या जागीं मोकाट सुटलेलीं गुरें आणून कोंडतात ती जागा. जा तुम्ही बघायला. जे मालक आपलीं गुरं नीट संभाळीत नाहींत, ज्यांचीं गुरं दुसऱ्याच्या बागेंत अगर शेतांत जाऊन त्रास देतात, त्यांना ताळ्यावर आणण्याकरितां ही सोय आहे. दंड भरल्याशिवाय मालकाला कोंडवाड्यांतून आपलें जनावर मिळत नाहीं. खेडेगांवीं कोंडवाड्यांची फार जरुरी असते. गुरांच्या मालकांवर तो एक वचक आहे व गांवांतल्या लोकांना तें संरक्षण आहे.

सकाळपासून धाकट्या मुलाला थोडें बरें वाटत नव्हतें. संध्याकाळीं वडिलांनीं गणूला त्याला दवाखान्यांत नेण्यास सांगितलें. मुलें निघालींच बरोबर.

"बाबा, शहरासारखा इथं मोठा दवाखाना व डॉक्टर नसेल नाहीं ? ',

**वडील :** अर्थातच नाहीं. खेडेगांवच्या लोकांना इतके पैसे देण्याची कुठली ऐपत ? मोठा डॉक्टर येथें येऊन त्याला मिळणार काय ? परंतु खेडेगांवांतील गरीब लोकांनाही औषधोपचार करतां यावा यासाठीं चालचलाऊ दवाखाने उघडून मोफत औषध देण्याची व्यवस्था केलेली असते. गरीबगुरिबांना येथें फुकट औषध मिळतें. मोफत दवाखाना ही खेडेगांवांतील लोकांना मोठी सोय आहे.

माणसांच्या दवाखान्याप्रमाणें गुरांचाही दवाखाना असतो. मात्र हाही तालुक्याच्या ठिकाणीं असतो. खेडेगांवीं गुरांच्या डॉक्टरची फार जरुरी

असते. कारण खेडेगांवचे पुष्कळ लोक शेतकरी असतात व शेतकीला गुरेंढोरें अवश्य असतात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरीं आलेले पाहुणे परत जायचे होते. मुलांच्या वडिलांनीं मुलांना सडकेवर उभें राहाण्यास व मोटार जाईल त्या वेळीं मोटारवाल्यास दुसऱ्या दिवशींची एक 'सीट' राखून ठेवण्याविषयीं सांगण्यास सुचविलें. ते म्हणाले,

'येथें आगगाडी नाहीं. खेडेगांवचा प्रवास बहुधा मोटारीनेंच करावा लागतो. क्वचित् ठिकाणीं देशांतल्या खेडेगांवावरून आगगाडी जाते. कोंकणांतल्या खेडेगांवांत मोटार येण्यापूर्वीं बैलगाडीचा त्रासदायक प्रवास होता. मोटारबस झाल्यानें खेड्यांतल्या लोकांची जाण्यायेण्याची मोठीच सोय झाली आहे.'

**मुलें** : पण बाबा, मोटारीला रस्ते गुळगुळीत पाहिजेत. खेडेगांवांतल्या रस्त्यावर मोटारी खराब नाहीं का होत ?

**वडील** : इकडच्या मोटारबसेस तशाच मजबूत असतात. बोलून चालून खेडेगांवांतील सडका; त्या शहराच्या इतक्या उत्तम कशा असणार ? तरीसुद्धा जिल्हापरिषदेनें रस्ते दुरूस्तीचें काम हातीं घेतलें आहे. कच्च्या सडकेवर खडी व रेती घालून आणि रूळ फिरवून दुरुस्ती होत आहे. इंजिन चालू आहे पाहिलंत ना सडकेवर ?

**मुलें** : बाबा, जिल्हापरिषद म्हणजे काय हो ?

**वडील** : खेड्याची व्यवस्था पाहण्यासाठीं जशी ग्रामपंचायत असते तशी जिल्ह्याच्या व्यवस्थेसाठीं जिल्हापरिषद ही संस्था असते. जिल्हापरिषदेचे सभासद लोकांनींच निवडून दिलेले असतात. एका तालुक्यांत पुष्कळ खेड्यांचा समावेश करण्यांत येतो. तालुक्यासाठीं पंचायतसमिति असते. पाणीपुरवठा, नळ, विहिरी, दळणवळणाचीं

साधनें, रस्ते, पूल, दवाखाने, शिक्षणाची सोय या गोष्टी जिल्हापरिषदे-तर्फे होतात. त्यांना उत्पन्न लोकलफंड, कर, जकात या साधनांनीं होतें. सरकारचीही ग्रँट मिळते.

**मुलें** : बाबा, गणूचीं मुलं परिषदेच्या शाळेंत जातात, ती जिल्हा-परिषदेचीच शाळा तर ! बरीच मुलं आहेत त्या शाळेंत.

**वडील** : हळूहळू खेड्यांतील लोकांनाही शिक्षणाची जरुरी व महत्त्व पटूं लागलें आहे आणि म्हणूनच जिल्हापरिषद खेड्यांतून शाळा उघडीत आहे. सरकारनें सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा पास केला आहे. केवढी सोय आहे ही शिक्षणाची ? सर्वांनीं त्याचा फायदा घेतला पाहिजे.

**मुलें** : बाबा, देवळाशेजारीं ती केवढी मोठी विहीर बांधीत आहेत हो ? बाबा, सडकेवर नळ असतांना इतक्या विहिरी कशाला हो ?

**वडील** : एक दोन नळांचें पाणी कोणाकोणाला पुरणार ? सगळ्या लोकांना नळाचें पाणी पुरविण्याइतका पाण्याचा सांठा इकडे नाहीं. नळांची व्यवस्थाही मोठ्या प्रमाणावर येथें शक्य नाहीं. खर्चाची गोष्ट आहे ती. त्यामुळें मोठमोठ्या विहिरी खणून लोकांना पाणीपुरवठा करणें जरूर पडतें. हें कामही जिल्हापरिषदेचेंच आहे. एका विहिरीवर शेंकडों माणसें पाणी भरत असतात.

**मुलें** : बाबा, मागें या सोयी नव्हत्या का हो खेड्यांत ?

**वडील** : पुष्कळ ठिकाणीं नव्हत्या. होत्या तेथें अत्यंत थोड्या प्रमाणांत होत्या. मागचें खेडेगांवचें जीवन आणि आजचें जीवन यांत केवढें तरी अंतर आहे. कांहीं वर्षांपूर्वी खेड्यांतील राहाणी अत्यंत त्रासदायक वाटे. वाहनाची सोय नाहीं. पाण्याची सोय नाहीं, औषधाची, बाजाराची, शिक्षणाची सोय नाहीं. परंतु हल्लीं ग्रामपंचायत व जिल्हापरिषद या

सार्वजनिक हितासाठीं झटणाऱ्या संस्था अस्तित्वांत आल्यापासून खेडेगांवांतील जीवन पुष्कळच सुरक्षित व सुखाचें झालें आहे. बाजार, दवाखाना, पोस्ट, कोंडवाडा, सडका, विहिरी, मोटारबसेस, शाळा, इत्यादि सुखसोयी खेड्यांत झाल्यामुळें खेडेगांवांतील लोकांची राहाणी पुष्कळच सुधारली आहे व जसजसा शिक्षणाचा प्रसार होईल, तसतसें पंचायत व जिल्हापरिषदेचें कामही अधिक निर्दोष व निःस्वार्थी होत जाईल आणि खेडेगांवांची सुधारणा अधिक झपाट्यानें होत जाईल.

---

**अभ्यास :** ( १ ) खेडेगांवांत बाजाराची व्यवस्था काय असते ? ( २ ) खेडेगांवचें पोस्ट ऑफिस कसें चालतें ? ( ३ ) कोंडवाडा म्हणजे काय व तो कशासाठीं असतो ? ( ४ ) खेडेगांवांत औषधपाण्याची काय व्यवस्था असते ? ( ५ ) खेडेगांवांत पुष्कळशा विहिरी कां लागतात ? ( ६ ) खेडेगांवांतील सुखसोयींमुळें खेडेगांवची राहाणी कशी सुधारली आहे तें सांगा. ( ७ ) जिल्हापरिषद म्हणजे काय व त्याचीं कामें कोणतीं ?

---

## ३. शहराचा कारभार : म्युनिसिपालिटी

शहरांत देवीची सांथ सुरू होईल कीं काय अशी भीति वाटूं लागली होती. कांहीं कांहीं भागांत थोडी थोडी लागण व थोडे थोडे मृत्यु होत होते. सांथ सुरू होऊं नये, निदान पसरूं नये व वाढूं नये म्हणून म्युनिसिपालिटीनें सर्व लोकांस वर्तमानपत्रांतून धोक्याची सूचना दिली होती व सगळ्यांनीं, विशेषत: मुलांना देवी टोचून घेण्याचा सल्ला दिला होता. त्याप्रमाणें ठिकठिकाणीं टोचण्याची सोय म्युनिसिपालिटीनें केली होती. म्युनिसिपालिटीच्या ऑफिसमध्येंही सकाळ–संध्याकाळ म्युनिसिपालिटीचा देवीडॉक्टर शेंकडों लोकांना टोचीत होता.

आज शनिवार असल्यामुळें मुलांची शाळा व वडिलांचें ऑफिस हीं दोन वाजतां सुटलीं. संध्याकाळीं मुलांना घेऊन वडिलांनीं म्युनिसि

पालिटीच्या ऑफिसांतच टोंचण्यास जाण्याचें ठरविलें. मुलांचे वडील बरोबर जाणार असल्यानें शेजारच्या ओळखीच्या एकदोन कुटुंबांनीं आपलीही मुलें इकडेच पाठविलीं. दोन घरचीं मुलें जमल्यावर तीं आपापसांत बोलूं लागलीं.

"अरे, टोंचतांना दुखेल कीं रे! आपल्याला भीति वाटते बाबा!"

"एक नाहीं, दोन ठिकाणीं टोंचायचें! सुई भोसकतात! रक्त येतें हातांतून बाहेर!"

**वडील** : उगीच काय रे एकमेकांना घाबरवतां? दुखत नाहीं आणि रक्त येत नाहीं! टांचणी बोटाला लागली तर जसें होतें, तसेंच टोंचलें म्हणजे वाटतें.

**मुलें** : उंः! मग कोण भितं? दोन ठिकाणींच काय चार ठिकाणीं टोंचलं तरी आम्ही रडणार नाहीं.

**मुलें** : आपण म्युनिसिपालिटींत जाणार आहोंत, तेथें आम्हांला दुसरेंही थोडें काम सांगितलें आहे आमच्या दादांनीं.

**वडील** : तें काय?

**मुलें** : आमच्या घरासमोर रस्त्यावरचा नळ फुटला आहे व शेजारच्या घराबाहेर ड्रेनेजची मोरी तुंबली आहे.

**वडील** : तर मग त्याची खबर म्युनिसिपालिटींत ताबतोबच कळविली पाहिजे.


**मुलें** : मग बाबा, आपल्या घरासमोर कचऱ्याचा केवढा तरी ढीग सांठला आहे. तसेंच मागच्या बाजूला रस्त्यावर सकाळपासून एक कुत्रें मरून पडलें आहे, तेंही तेथून उचललें पाहिजे.

**वडील** : खरें कीं काय? तर मग ती गोष्ट म्युनिसिपालिटींत लवकर कळविली पाहिजे. नाहींतर तें कुजून त्याची घाण सुटेल सगळीकडे.

**मुलें** : पलीकडचा तो रस्त्याचा कंदील तरी कुठें नीट केला आहे दोन तीन दिवस ? मागच्या घरवाल्याकडे उंदरांचा पिंजरा किती दिवस मिळाला नाहीं !

**वडील** : तर मग आज म्युनिसिपालिटींत पुष्कळच कामें आहेत. या सगळ्या गोष्टी वेळींच कळवून त्यांची दाद लावून घेतली पाहिजे.

**मुलें** : पण बाबा, सगळ्या गांवच्या तक्रारी येणार. लक्ष तरी कोणाकोणाच्या तक्रारींकडे दिलें जाणार ?



**वडील** : असें कसें म्हणून चालेल ? अशा गोष्टींची खबर देणें हें आपलें शहरचे रहिवासी अथवा नागरिक म्हणून कर्तव्य आहे व त्याची दाद घेणें हें म्युनिसिपालिटीचें अथवा नगरपालिकेचें कर्तव्य आहे. नगरपालिका म्हणजे काय ? नगर म्हणजे गांव, पालिका म्हणजे पालन करणारी. शहराचा सांभाळ करणारी. आई जसा मुलांचा सांभाळ करते, तसा नगरपालिकेनें गांवांतील लोकांचा सांभाळ केला पाहिजे.

**मुलें :** बाबा, ही म्युनिसिपालिटी का नगरपालिका म्हणजे काय असतें हो ?

**वडील :** नगरपालिका ही एक लोकांच्या कामासाठीं लोकांनींच निवडलेली कांहीं लोकांची सभा अथवा संस्था. या संस्थेंत गांवांतले सज्ञान लोक आपल्या बहुमतानें लोकसंख्येच्या प्रमाणांत आपले प्रतिनिधि निवडून देतात. हे प्रतिनिधि अथवा सभासद आपल्या गांवाचा सर्व कारभार बघतात. त्यांना नगरपिते असें म्हणतात. पिता म्हणजे बाप, पालक. गांवापुरतें हें लोकांचें राज्य, म्हणजेच स्वराज्य, म्हणून म्युनिसिपालिटीला किंवा नगरपालिकेला स्थानिक स्वराज्य संस्था असें म्हणतात व तिच्या कारभाराला स्थानिक स्वराज्य म्हणजे त्या त्या गांवांत त्या त्या लोकांचें राज्य असें म्हणतात.

**मुलें :** सगळ्या लोकांचें नाहीं, थोड्या लोकांचें.

**वडील :** असें कसें ? प्रत्यक्ष कारभार थोडे लोक करीत असले, तरी ते सगळ्या लोकांचे प्रतिनिधि असतात ना ? लोकांनीं आपल्या मतानें त्यांना निवडून दिलें असतें ना ? लोकांचा त्यांच्यावर विश्वास असतो ना ? लोकांच्या इच्छेप्रमाणें ते काम करतात ना ? ते जें जें करतील त्याला सर्व लोकांचा पाठिंबा असतो ना ? यालाच लोकशाही अथवा लोकांचें राज्य म्हणतात. लोकांचें, लोकांसाठीं व लोकांनीं केलेलें राज्य असें लोकशाहीचें वर्णन करण्यांत येतें.

**मुलें :** बाबा, नगरपालिकेंत कोण कोण असतात हो ?

**वडील :** नगरपालिकेचे सभासद ( यांची संख्या शहराच्या लोकवस्तीवर अवलंबून असते ), त्यांनीं निवडलेला अध्यक्ष व उपाध्यक्ष हे लोकांचे प्रतिनिधि असतात. अध्यक्ष हा सर्व कारभाराबद्दल सरकारला जबाबदार असतो. तो कांहीं कामें उपाध्यक्षास वांटून देतो. याखेरीज

निरनिराळ्या खात्यांचीं कामें पाहाण्यासाठीं वेगवेगळ्या पोटकमिट्या असतात. निरनिराळ्या खात्यांचे अधिकारी : चीफ ( मुख्य ) ऑफिसर, इंजीनिअर, हेल्थ ऑफिसर–डॉक्टर, मार्केट इन्स्पेक्टर, व्हॅक्सिनेटर ( देवी डॉक्टर ), सॅनिटरी इन्स्पेक्टर ( साफसफाईवर देखरेख करणारा ) व त्यांच्या हाताखालीं काम करणारे, हे सर्व नगरपालिकेचे पगारी नोकर असतात.

**मुलें** : बाबा, नगरपालिकेला काय काय कामें करावीं लागतात हो ?

**वडील** : शहराची स्वच्छता, सार्वजनिक आरोग्याचें रक्षण, पाणी-पुरवठा व सांडपाण्याची व्यवस्था, रस्त्याची बांधणी व दुरुस्ती, रात्रीची दिवाबत्ती, प्राथमिक शिक्षणाची सोय हीं म्युनिसिपालिटीचीं मुख्य कामें होत.

**मुलें** : हीं कामें कशीं केलीं जातात हो बाबा ?

**वडील** : शहराच्या स्वच्छतेसाठीं म्युनिसिपालिटीचे इन्स्पेक्टर्स व मुकादम हे झाडूवाले व भंगी यांच्याकरवीं रस्ते व गटारें साफ करवितात आणि खाजगी व सार्वजनिक शौचकूप रोज साफ करवून ती घाण गांवाबाहेर नेऊन टाकवितात.

सार्वजनिक आरोग्यासाठीं म्युनिसिपालिटीचा हेल्थ ऑफिसर देवी डॉक्टरकरवीं नवीन जन्मास येणाऱ्या मुलांस देवी काढण्याची व्यवस्था करतो. देवी, प्लेग, कॉलरा अशा तऱ्हेचे सांथीचे रोग मुळांतच उद्भवूं नयेत व उद्भवल्यास निदान वाढूं नयेत व पसरूं नयेत म्हणून सर्व लोकांस वेळोवेळीं जरूर त्या सूचना तो देतो व म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यामार्फत लस टोंचण्याची व औषधोपचार करण्याची व्यवस्था करतो. लोकांस अन्न, पाणी, फळें, दूध शुद्ध मिळणें ज़रूर असल्यानें पाण्यांत जंतुनाशक द्रव्य घालून तें स्वच्छ ठेवणें, बाजारांत विकण्यासाठीं

येणारीं फळें, भाज्या, दूध, दहीं, मेवामिठाई, इत्यादींवर नियंत्रण ठेवणें, हीं सगळीं त्याचीं कामें आहेत. स्वच्छता हा आरोग्याचा पाया असल्यानें तो त्या बाबतींतही काळजी घेतो.

शहराच्या निरनिराळ्या भागांत रुंद व मजबूत रस्ते तयार करणें, वाहतुकीच्या खुणा ठरविणें, दिवाबत्तीची सोय करणें, सार्वजनिक इमारती, शाळा, धर्मशाळा, दवाखाना, मार्केट, वगैरे बांधणें, हीं कामें चीफ ऑफिसर व त्याच्या हाताखालचे लोक करीत असतात.

लहान मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी म्युनिसिपालिटीचीच असते. त्यासाठीं म्युनिसिपालिटी एक स्कूलबोर्ड नेमीत असते. त्याच्या-मार्फत शहराच्या निरनिराळ्या भागांत सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाची सोय केली जाते. या शाळांचा सर्व खर्च म्युनिसिपालिटी चालविते.

याखेरीज सार्वजनिक वाचनालयें, ग्रंथसंग्रहालयें, इत्यादि लोक-शिक्षणाचीं इतर साधनेंही म्युनिसिपालिटी चालविते.

**मुलें** : बाबा, या सगळ्यासाठीं लागणारा पैसा कोठून येतो हो ?

**वडील** : राज्यकारभार चालविण्यासाठीं सरकार लोकांवर कर बसवीत असतें, त्यांतला कांहीं भाग नगरपालिकेला मिळतो. तसेंच घरपट्टी, भंगीपट्टी, पाणीपट्टी या करांपासूनही तिला उत्पन्न होतें. शहरांत येणाऱ्या मालावर म्युनिसिपालिटीची जकात असते. दुकानांवरही करभाडें असतें. वाहनांवर, करमणुकीवरही कर बसविला जातो. सरकारकडूनही केव्हां केव्हां मदत मिळते. अशा निरनिराळ्या मार्गानें म्युनिसिपालिटीला जरूर तो पैसा मिळतो. म्युनिसिपालिटीचा कारभार लोकांच्या हातांत असतो. सरकारची तिच्या कामकाजावर देखरेख असते.

**मुलें** : आणखी कांहीं कामें असतात का बाबा नगरपालिकेचीं ?

**वडील :** शहराच्या स्वच्छतेप्रमाणें त्याचें सौंदर्य वाढविणें व नागरिकांसाठीं सुखसोयी करणें, या गोष्टींकडेही नगरपालिकेचें लक्ष असावें लागतें. ठिकठिकाणीं बागबगीचे, खुलीं मैदानें, क्रीडांगणें तयार करणें, रस्त्यांची व घरांची शोभिवंत आंखणी करणें, चौक करणें, पुतळे उभारणें वाहनांना उत्तेजन देणें याची व्यवस्था नगरपालिकाच करते.

**मुलें :** केवढा तरी व्याप आहे हो हा कामांचा, बाबा !

**वडील :** आहे तर ! एक घरांतला कारभार चालवायला वडील मंडळींना केवढा त्रास पडतो; मग हा तर सगळ्या गांवचा कारभार. केवढा खटाटोप असेल बरें ! म्हणून तर नगरपालिकेच्या सभासदांना नगरपितें म्हणतात. त्यांची जबाबदारी फार मोठी आहे. त्यांचें कार्यही फार महत्त्वाचें आहे. सर्व शहराचें कल्याण व लौकिक त्यांच्यावर आहे. लोकांनीं लायक अशाच व्यक्तींना नगरपालिकेंत निवडून दिलें तर नगरपालिकेचें 'लोकराज्य' उत्तम होईल. नगरपित्यांना लोक मान देतील. तेही लोकांचा विश्वास व प्रेम संपादन करतील. शहराचा कारभार उत्तम तऱ्हेनें चालेल. शहरांत सर्वत्र सौख्य व शांतता नांदेल. लोकांना स्वराज्य आणि सुराज्य अनुभवण्यास मिळेल.

खेडेगांवांत जशी ग्रामपंचायत, तशी शहरांत नगरपालिका किंवा म्युनिसिपालिटी. मुंबई, पुणें, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांच्या ठिकाणीं असलेल्या अशा लोकसंस्थेला 'कॉर्पोरेशन' म्हणतात. या सर्व स्थानिक-स्वराज्य संस्थांचा हेतु व काम करण्याच्या पद्धतीचें तत्त्व एकच. तें म्हणजे आपला कारभार आपण करणें. यासाठीं लोकप्रतिनिधि व लोक यांच्यांत पूर्ण सलोखा व सहकार्य पाहिजे. प्रतिनिधींनीं लोकमताला मान दिला पाहिजे. लोकांनीं प्रतिनिधींच्या धोरणाला पाठिंबा दिला पाहिजे. लोकशाही म्हणजे बहुमतानें चालणारा कारभार. लोकशाहीचें हें तत्त्व

सर्वांनीं शिकलें पाहिजे. परस्परांबद्दल स्नेहभाव व आदर बाळगला पाहिजे स्वार्थत्याग व समाजसेवा हे उदात्त हेतु सगळ्यांनीं डोळ्यांसमोर ठेविले पाहिजेत. स्थानिक स्वराज्य हा संपूर्ण स्वातंत्र्याचा पहिला हप्ता होय !

स्थानिक स्वराज्यसंस्था ही लोकराज्याची पाठशाळा-पूर्वतयारी-प्रारंभ-होय असें म्हटलें आहे.


---

**अभ्यास :** ( १ ) म्युनिसिपालिटीला नगरपालिका कां म्हणतात ? ( २ ) नगरपिते म्हणजे कोण ? व त्यांचें काम काय ? ( ३ ) स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणजे काय ? म्युनिसिपालिटी ही स्थानिक स्वराज्यसंस्था कशी होते ? ( ४ ) म्युनिसिपालिटींत कोण कोण अधिकारी असतात. ? त्या अधिकाऱ्यांचीं कामें कोणतीं ? ( ५ ) म्युनिसिपालिटीचीं कामें काय काय असतात ? ( ६ ) म्युनिसिपालिटीचा कारभार यशस्वी होण्यास काय काय गोष्टी आवश्यक आहेत ? ( ७ ) ‘ स्थानिक स्वराज्य हा संपूर्ण स्वराज्याचा पहिला हप्ता होय ’ हें कसें तें स्पष्ट करा.

---

## ४. शहरांतील नागरिक सुखसोयी

मधली सुट्टी संपून शाळा पुन्हा भरली होती. वर्गांत वादविवादाचा तास होता. ‘ शहराचें जीवन व खेडेगांवचें जीवन—कोणतें अधिक चांगलें ? ’ असा विषय होता. खेडेगांवच्या बाजूनें बोलणाऱ्या मुलांचीं भाषणें संपलीं होती. खेडेगांवची शुद्ध हवा, मोकळें वातावरण, नैसर्गिक जीवन, साधी राहाणी, स्वास्थ्य व शांतता, इत्यादि गोष्टींची स्तुति करण्यांत आली. उलट शहरांतील बजबजाट, कलकलाट, कोंदट हवा, कृत्रिम जीवन, धांदल व धांवपळ यांविषयीं नापसंती व्यक्त करण्यांत आली. एका बाजूचीं भाषणें संपल्यानंतर मास्तरांनीं शहराच्या बाजूनें बोलणाऱ्या मुलांना आपलें म्हणणें पुढें मांडण्याविषयीं सूचना केली. दोन्ही बाजूंचीं भाषणें झाल्यानंतर मास्तर स्वतः समारोप करणार होते.



१ **मुलगा** : खेड्यांतील व शहरांतील जीवनाचे फायदे आणि तोटे यांची तुलना केली तर असें सिद्ध करतां येईल, कीं खेडेगांवांत राहाण्याचे फायदे थोडे व तोटे फार आहेत, उलट शहरांत राहाण्याचे तोटे थोडे व फायदे फार आहेत. शहर व खेडेगांव या दोन्ही ठिकाणीं राहिलेला कोणीही खेडेगांवापेक्षां शहरांत राहाणें केव्हांही अधिक चांगलें असेंच कबूल करील. सुखसोयी व सुधारणा या दोन्ही दृष्टींनीं पाहातां शहर व खेडेगांव यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे.

२ **मुलगा** : प्रथम पाणीपुरवठ्याची गोष्ट घ्या! शहरांत नदीवरून अथवा तळ्यावरुन पाणी आणावें लागत नाहीं, विहिरींतून रहाटानें ओढण्याचा खटाटोपही करावा लागत नाहीं. घरोघर नळ आहेत. खोलीखोलींत नळ घेतां येतात. केवढी ही सोय! धरणांत पाण्याचा साठा करावयाचा व मग तेथून मोठ्या लोखंडी नळांतून तें शहराच्या निरनिराळ्या भागांत न्यावयाचें व तेथून लहान नळांवाटे तें घरोघरीं पुरवायचें. पाणीपुरवठ्याच्या या व्यवस्थेसाठीं एक स्वतंत्र खातें करावयाचें आणि त्यावर तज्ज्ञ व जबाबदार माणसांची योजना करावयाची. त्यानीं त्या खात्यातर्फे नळांतून स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवण्याची काळजी घ्यावयाची. त्यांत जरूर तेव्हां औषधें मिसळून त्यांतील घाण अथवा जंतु नाहींसे करावयाचे व घाणेरड्या पाण्यामुळें होणारे दोषिक ताप, कॉलरा, हगवण यांसारखे रोग न होऊं देण्याची खबरदारी घ्यावयाची. केवढा फायदा आहे हा!

३ **मुलगा** : रस्त्याची अगर दिवाबत्तीची गोष्ट घ्या! खेडेगांवचे रस्ते किती खराब व खडबडीत! शहराचे किती उत्तम व गुळगुळीत. डांबरी रस्त्यावर चालतांना पायांना किती बरें वाटतें. खाचखळगे नाहींत नि खडे नाहींत. यासाठीं म्युनिसिपालिटीचें एक स्वतंत्र खातें आहे.

नवे रस्ते करणें व जुने रुंद करणें, सुधारणें यांसाठीं दरवर्षी केवढा तरी पैसा खर्च होत असतो. दिवाबत्तीची सोयही केवढी असते. थोड्या थोड्या अंतरावर विजेचे, निदान रॉकेलचे दिवे लावून रात्रीं रस्त्यावर प्रकाश देण्याची व्यवस्था केलेली असते. दिवसा सूर्याचा उजेड, रात्रीं दिव्यांचा उजेड. लोकांची ही केवढी सोय आहे ! नुसत्या रस्त्यांवरच नाहीं, तर प्रत्येक सार्वजनिक ठिकाणीं दिव्यांची सोय म्युनिसिपालिटी करीत असते. मंडई सार्वजनिक बाग, इत्यादि ठिकाणीं पाहा.

**४ मुलगा :** स्वच्छतेच्या बाबतींत तर खेडेगांव आणि शहर यांत तुलनाच नाहीं. शहरांत कचरा अथवा घाण दूर नेण्यासाठीं केवढी तरी व्यवस्था असते. म्युनिसिपालिटीचे झाडूवाले, कचरा वाहून नेणाऱ्या गाड्या, धूळ उडूं नये म्हणून रस्त्यावर पाणी घालणाऱ्या पाण्याच्या गाड्या, पाणी वाहून जाण्यासाठीं गटारें, या गोष्टी खेडेगांवात दिसतात तरी का ? तसेंच मोरींतील व शौचकूपांतील घाण वाहून नेण्यासाठीं फ्लशिंगची व ड्रेनेजची पद्धत, हीं माहीत तरी आहेत का खेड्यांतल्या लोकांना ? खेडेगांवांत संडास किंवा त्यांतील घाण नेण्यासाठीं भंगी आहेत का ? गटारें किंवा मोऱ्या तुंबल्या तरी ताबडतोब म्युनिसिपालिटीचीं माणसें येऊन तीं मोकळीं करून देतात. सार्वजनिक स्वच्छतेच्या व आरोग्याच्या बाबतींत केवढी काळजी घेतली जाते शहरांत. म्युनिसिपालिटीचें एक स्वतंत्र खातें व अधिकारी आहे त्यासाठीं !

**५ मुलगा :** औषधपाण्याच्या सोयीच्या बाबतींत तोच प्रकार ! खेडेगांवांत डॉक्टर भेटण्याची व औषध मिळण्याचीसुद्धा मारामार ! शहरांत गल्लोगल्लीं डॉक्टर ! गरीबगुरिबांनासुद्धा औषध मिळण्याची पंचाईत पडत नाहीं. म्युनिसिपालिटीतर्फे मोफत दवाखाने उघडलेले असतात. तेथें रोग्यांना फुकट तपासलें व औषध दिलें जातें. तसेंच विशेष तऱ्हेच्या

आजारांसाठीं अथवा शस्त्रक्रियेसाठीं मोफत रूग्णालयेंही शहरांत असतात. कित्येक गरीब लोकांची या ठिकाणीं असाध्य रोगांतून सुटका होते. दानशूर श्रीमंतांच्या औदार्यावर हीं रुग्णालयें चालतात व गरीब-गुरिबांना त्यांचा फायदा मिळतो. खेडेगांवांत या गोष्टी नाहींत !

६ **मुलगा** : बाजाराची गोष्ट घ्या ! खेडेगांवांत आठवड्यांतून एक दिवस बाजार भरावयाचा व तेथें जेमतेम जरुरीच्या गोष्टी मिळावयाच्या. शहरची परिस्थिति किती निराळी ? तेथें मार्केट असतें, मोठी बाजारपेठ असते. वाटेल तें, वाटेल त्या वेळीं, वाटेल तितकें मिळूं शकतें. भाजीपाला, धान्य, कापडचोपड, इतर सामान ठिकठिकाणीं भरलेलें दिसतें. एकदा बाजारांत गेलें, कीं वाटेल तें मिळतें. हीसुद्धा म्युनिसि-पालिटीनें केवढी सोय केली आहे ! पुन्हा बाजारांतला माल घाणेरडा असूं नये म्हणून त्यावर तपासणी असते. अपराध्याला दंड केला जातो. किती काळजी घेतली जाते या बाबतींत !

७ **मुलगा** : शेवटीं शिक्षणाची बाबत घ्या ! खेडेगांवांत शाळा आहे आहे, नाहीं नाहीं; मुलें गेलीं गेलीं, न गेलीं न गेलीं. सगळी अनास्था. या उलट शहरांत प्रत्येक भागांत म्युनिसिपालिटीच्या मोफत शाळा असतात. प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याचाही प्रयत्न केला जातो. शिक्षण अथवा साक्षरता हा सामाजिक सुधारणेचा गुरुमंत्र आहे. प्राथमिक शिक्षणावर केवढा तरी पैसा खर्च करण्यांत येतो ! त्याकरतां म्युनिसिपालिटीची स्वतंत्र स्कूलकमिटी असते. सक्तीचें मोफत प्राथमिक शिक्षण हें म्युनिसिपालिटीचें पहिलें कर्तव्य समजलें जातें. उच्च शिक्षणाचीही सोय शहरांत असते.

८ **मुलगा** : मुख्य मुख्य बाबींचा व आवश्यक गोष्टींचा विचार आतांपर्यंत झाला. परंतु याशिवाय शहराच्या जीवनाचें सौख्य व सौंदर्य

वाढविणाऱ्या कितीतरी गोष्टी सांगतां येतील. खुलीं मैदानें, सार्वजनिक बागा, घोड्याच्या गाड्या, मोटारी, एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जाण्यासाठीं आगगाड्या, स्टेशनें, वाचनालयें, वस्तु व पशुसंग्रहालयें, सिनेमा व नाटकगृहें, जिमखाने, एक ना दोन हजार गोष्टी दाखवतां येतील. तेव्हां सर्व गोष्टींचा विचार करतां खेडेगांवांपेक्षां शहरांतील जीवन कितीतरी सुखाचें व सोयीचें हें कोणालाही कबूल करावें लागेल.

**मास्तर :** मुलांनो, आजचा वादविवाद खरोखर सुंदर झाला. समारोप करतांना मी एवढेंच म्हणेन, कीं खेडेगांव व शहर या दोहोंचेही फायदे तोटे आहेत. खेडेगांव देवानें निर्माण केलें व शहर मनुष्यानें असें एक वाक्य आहे. त्यांतील भावार्थ उघड आहे. नैसर्गिक जीवनाचा फायदा खेडेगांवांत मिळतो. मानवी सुधारणेचा फायदा शहरांत मिळतो. एवढें मात्र खरें, कीं सुखसोयीच्या व सुधारणेच्या बाबतींत शहर खेडेगांवाच्या फार पुढें आहे. शहरांत म्युनिसिपालिटी जें कार्य करते, तशाच तऱ्हेचें कार्य खेडेगांवांत ग्रामपंचायत करते. परंतु शहरांतील लोक अधिक सुशिक्षित व सुधारलेले असल्यामुळें शहराच्या कारभारांत सामाजिक दृष्टि, जबाबदारीची जाणीव, लोकसेवेची आवड, परस्पर सहानुभूति, सहकार्य हे गुण अधिक प्रमाणांत आढळून येतात. नागरिकांच्या हक्कांची व जबाबदाऱ्यांची जाणीव शहरांत अधिक दिसून येते. पंचायत व म्युनिसिपालिटींतील फरक थोड्या फार प्रमाणांत खेडेगांवच्या व शहरच्या रहिवाश्यांत पाहावयास सांपडतो.

---

**अभ्यास :** ( १ ) खेडेगांवांत राहाण्याचे फायदे कोणते ? तोटे कोणते ? (२) शहरांत पाणीपुरवठ्याची सोय काय असते ? (३) शहरांत रस्त्यांची व दिवाबत्तीची व्यवस्था कशी असते ? (४) सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य ह्या बाबतींत शहरांत काय काळजी घेतली जाते ? ( ५ ) शहरांत शिक्षणाची काय सोय असते ? ( ६ ) शहरांत इतर कोणत्या सुखसोयी असतात ? ( ७ ) खेडेगांवापेक्षां शहर कोणत्या दृष्टीनें श्रेष्ठ ?

# ५. शालेय पंचायतीची संघटना

उन्हाळ्याची सुटी संपून शाळेचें नवीन वर्ष नुकतेंच सुरू होत होतें. वार्षिक परीक्षेचा निकाल होऊन वर्गपालटी झाली होती. नव्या वर्गाच्या अभ्यासास लवकरच सुरुवात व्हावयाची होती. नव्या अभ्यासक्रमांत ‘ नागरिकशास्त्र ’ हा नवीन विषय होता. त्या अभ्यासक्रमाप्रमाणें चौथ्या इयत्तेला ‘ शालेय पंचायतीची संघटना ’ करणें हा एक भाग होता. पंचायतीबद्दल पुस्तकी व तोंडी माहिती त्यांना मिळाली होती. आतां थोड्या प्रमाणावर त्याचा प्रत्यक्ष प्रयोग शाळेंत करण्याचें काम ठरलें होतें. त्याप्रमाणें एक दिवस ठरविण्यांत आला व त्याप्रमाणें निरनिराळ्या वर्गांना तो दिवस आणि निवडणुकीची व मतदानाची वेळ कळविण्यांत आली.

मास्तर वर्गांतील मुलांस निवडणुकीची पद्धत समजावून देऊं लागले.

**मास्तर :** हें पाहा, शाळेंत एकंदर सात वर्ग आहेत. त्या प्रत्येक वर्गाचा त्या वर्गानें एक एक प्रतिनिधि शाळेच्या पंचायतीवर निवडून द्यावयाचा आहे. प्रत्येक वर्गांत सुमारें चाळीस मुलें आहेत. या चाळीस मुलांनीं आपापला वर्गप्रतिनिधि निवडावयाचा आहे. तुमच्या वर्गांत निवडणुकीसाठीं कोण कोण उभे राहाणार आहेत ?

**कांहीं मुलें :** देशमुख, मास्तर.

**दुसरीं कांहीं मुलें :** देशपांडे, मास्तर.

**इतर कांहीं मुलें :** पाटील, मास्तर.

**मास्तर :** एकूण तिघे तर. या तिघांना तुम्हांपैकीं कांहीं कांहीं मुलांचा पाठिंबा आहे. ते तयार असतील तर तुमच्या वर्गाच्या निवडणुकीसाठीं हे तिघे उमेदवार ठरले. या तिघांपैकीं एक निवडला जाणार. तो म्हणजे तुम्हांकडून ज्याला सर्वांत अधिक मतें मिळतील तो !


बहुमताचा ज्याला पाठिंबा असेल तो. निवडणुकीच्या वेळीं तुम्हांपैकीं प्रत्येकाला मतपत्रिका दिली जाईल. त्यावर तिघांही उमेदवारांचीं नांवें असतील. त्यांपैकीं जो तुम्हांला निवडून द्यावा असें वाटत असेल त्याच्या नांवाच्या बाजूला × अशी फुली करून ती मतपत्रिका पेटींत टाका. तुमचें नांव त्या कागदावर लिहूं नका. याला मतदान म्हणतात. ही गुप्त मतदानपद्धति.

**मुलें** : म्हणजे काय हो मास्तर ?

**मास्तर** : म्हणजे यांत कोणीं कोणाला मत दिलें हें समजत नाहीं. तुम्हांला जो योग्य वाटेल त्याला तुम्हांला मत देतां यावें म्हणून ही सोय आहे. नाहींतर एकाला मत दिलें कीं दुसरा रागावतो व तुमची स्थिति चमत्कारिक होते. तुम्हांला वाईटपणा घ्यावा लागतो. हें होऊं नये म्हणून गुप्त मतदान असतें. मत देणें हा तुमच्यापैकीं प्रत्येकाचा हक्क व प्रत्येकाचें कर्तव्य आहे. कोण काय सांगेल तें ऐका, परंतु शेवटीं तुम्हांला जो सर्वांत अधिक लायक वाटेल त्यासच मत द्या. मत हा एक पवित्र अधिकार आहे. त्याचा दुरुपयोग करूं नका; नाहीं तर लायक उमेदवार निवडणुकींत यशस्वी होणार नाहीं. तसेंच मतदान करण्यास चुकूं नका. त्यांत हयगय केली तर तुम्हीं आपलें कर्तव्य केलें नाहींत असें होईल व लायक उमेदवार एकाद्या मतानेंही पडेल व निवडणुकीचा हेतु फुकट जाईल. तसेंच एकदां निवडणुक झाली व बहुमतानें तुमचा प्रतिनिधि ठरला, म्हणजे मग सर्वांनीं तो आपला प्रतिनिधि समजून त्यावर विश्वास टाकला पाहिजे. मग तुम्हीं त्याला आपलें मत दिलें असो वा नसो. बहुमताचा निकाल तुम्हीं आनंदानें मानला पाहिजे. यालाच खरी लोकशाही म्हणतात.

प्रत्येक वर्गांत अशाच तऱ्हेनें मास्तरांनीं मुलांना निवडणुकीची माहिती सांगितली. शेवटीं निवडणुकीचा दिवस आला. दुपारीं शाळेंतच बारा

ते दोन ही मतदानाची वेळ ठरविली होती. प्रत्येक वर्गांत पेटी ठेविली होती. वर्गशिक्षक मुलांस म्हणजेच मतदारांस मतपत्रिका देत होते व देखरेख करीत होते. बहुतेक मुलांनीं मतें दिलीं. थोडीं गैरहजर राहिलीं व थोडीं उशिरां आलीं. अर्थातच त्यांना मतदान करतां आलें नाहीं.




दोन वाजतां मतदान संपलें. पेट्या ऑफिसमध्यें नेण्यांत आल्या व हेडमास्तरांच्या देखत वर्गशिक्षकांनीं मतमोजणी केली. अर्ध्या तासानें निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यांत आला. प्रत्येक वर्गातर्फे कोण कोण निवडून आले हें त्या त्या वर्गास कळविण्यांत आलें. त्याचें नांव जाहीर होतांच वर्गांतील मुलांनीं टाळ्या वाजवून आपल्या प्रतिनिधीचें अभिनंदन केलें.

संध्याकाळीं हेडमास्तरांच्या देखरेखीखालीं प्रतिनिधींची सभा बोलावण्यांत आली. सातही प्रतिनिधि हजर होते. प्रथमतः हेडमास्तरांनीं त्या सर्वांचें निवडून आल्याबद्दल अभिनंदन केलें व नंतर ते म्हणाले,

"मुलांनो, तुम्ही सात प्रतिनिधि मिळून शाळेची पंचायत होणार. त्या पंचायतीमार्फत शाळेंतील मुलांचा सर्व कारभार चालणार. ग्रामपंचायत जशी खेडेगांवचा सर्व कारभार बघते. तशीच तुमची ही पंचायत शाळेतील सर्व गोष्टींकडे लक्ष देणार व म्हणूनच तिला शालेय पंचायत म्हणायचें. तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे व ती पार पाडण्यासाठीं तुम्हीं सर्वांनीं न्यायानें, समतेनें, स्नेहभावानें व खरेपणानें काम केलें पाहिजे; तरच मुलांचा तुमच्यावरील विश्वास कायम राहील व तुम्ही जें जें कराल त्याला त्यांचा पाठिंबा मिळेल.

तुम्हांला माहीत आहे, कीं पंचायतीला निरनिराळीं कामें करावीं लागतात. यासाठीं कामांची वाटणी करणें सोयीचें असतें. निरनिराळ्या माणसांकडे निरनिराळीं खातीं सोंपविलीं म्हणजे तीं व्यवस्थित होतात एकालाच अनेक कामें दिलीं तर गोंधळ उडतो व वेळेवर कामें होत नाहींत. तुम्ही सातजण आहांत. प्रथम तुम्ही आपला अध्यक्ष–मुख्य अथवा सरपंच–निवडा. त्याची पंचायतीच्या सर्व कारभारावर सामान्य देखरेख राहील. नंतर तो तुमच्या सल्ल्यानें तुम्हां उरलेल्या सहाजणांना निरनिराळीं कामें नेमून देईल. त्या त्या कामाचे मुख्य तुम्ही व त्या कामाची सर्व जबाबदारी तुमच्यावर. शाळेच्या कारभारांत कोणकोणतीं मुख्य कामें, सांगा पाहूं."

**प्रतिनिधि :** ( १ ) शाळेच्या इमारतींतील व मैदानांतील स्वच्छता, ( २ ) खाण्याच्या जागेची व पाणी पिण्याच्या हौदाची देखरेख, ( ३ ) निरनिराळ्या खेळांची व्यवस्था, ( ४ ) वर्गांतील व बाहेरील मुलांची शिस्त व वागणूक, ( ५ ) बागेची व्यवस्था व ( ६ ) वाचनालय, वादविवाद वर्ग, बालवीर पथक, इत्यादि वर्गाच्या अभ्यासाखेरीज असणाऱ्या गोष्टी.

**हेडमास्तर :** छान; तुम्हांला शाळेच्या कारभाराची योग्य कल्पना आहे - मग तुमच्याच सांगण्याप्रमाणें हीं कामाचीं सहा खातीं आपोआपच झालीं. त्यांपैकीं एकेक तुम्ही एकेकाच्या ताब्यांत द्या. तें तुम्ही तुमच्या व तुमच्या मुख्याच्या विचारानें ठरवा. तें ठरवतांना तुम्ही स्वतःची आवड व कामाची निवड यांचा मेळ घाला. भलत्याला भलतें काम देऊं नका. तुम्हीं आपला मुख्य कोण निवडलांत व कामें कशीं कशीं वाटून घेतलींत याचा तपशील मला मागाहून द्या. आज मी तुम्हां सर्वांना उद्देशून सर्वसाधारण दोन गोष्टी सांगतों.

तुम्ही जो मुख्य निवडाल, त्यावर तुमचा व तुमच्यावर त्याचा विश्वास पाहिजे. तुम्हीं सर्वांनीं एकीनें व खेळीमेळीनें काम केलें पाहिजे. बहुमताच तत्त्व तुम्हीं अमलांत आणलें पाहिजे. सामान्य धोरण सर्वांनीं मिळून ठरवावें, परंतु नंतर कोणींही दुसऱ्याच्या कारभारांत ढवळाढवळ करूं नये. त्याला त्याचें काम करण्यास स्वतंत्रपणा द्यावा. मतभेद झाला, तर बहुमताचा निर्णय मानावा.

तुम्ही आपल्या खात्याचें काम करीत असतां तुमचा शाळेंतील सर्व मुलांशीं संबध येईल. तुम्हीं हा माझा मित्र, हा माझा शत्रु, हा माझ्या वर्गांतला, हा दुसऱ्या वर्गांतला असा भेद करतां कामा नये; नाहीं तर मुलांचा तुमच्यावरील विश्वास उडेल. तुमचें काम करतांना जीं मुलें अपराधी असतील, त्यांचीं नांवें तुम्हीं कळविलीं पाहिजेत व त्यांचे मार्क बुडविण्याची किंवा त्यांना वर्गांत उभें करण्याची अगर घरीं उशिरां सोडण्याची किरकोळ शिक्षा तुम्हांला करतां येईल. शिक्षा करतांना जरूर तेथेंच व जरूर तेवढीच शिक्षा केली पाहिजे. अधिकाराचा दुरुपयोग कराल, तर तुम्ही आपली लोकप्रियता गमवाल. अपराध्याला शिक्षा करतांना येणारा वाईटपणा सोसण्यास तुम्हीं तयार असलें पाहिजे. तीच तुमच्या कर्तव्यबुद्धीची व जबाबदारीच्या जाणिवेची कसोटी आहे.

अशा रीतीनें तुम्हीं सर्वांनीं काम केलेंत तर शाळेच्या पंचायतीचा कारभार यशस्वी होईल व तुमचा मोठा नांवलौकिक होईल. तुम्हांला सर्व लोक शाबासकी देतील. मुलांचे अपराध मोठे असले तर त्या बाबी तुम्ही शिक्षकांकडे अथवा मजकडे आणा. तुम्ही त्या बाबतींत निकालही देऊं नका व शिक्षाही करूं नका. ज्या बाबी तुम्ही निकालांत काढाल, त्याही बाबतींत एखाद्या मुलाला अन्याय झालासा वाटला तर तो तुमच्या निकालाविरुद्ध आमच्याकडे तक्रार करील. असें त्यानें केलें म्हणून तुम्हीं राग मानतां कामा नये. तुम्ही सर्व लहान आहांत. तुमच्या हातून चुका होणारच. आम्ही त्या दुरुस्त करूं. हें सर्व शिक्षण आहे. अभ्यासांत तुमचें चुकेल तेथें शिक्षक तुम्हांला सुधारतात ना, तसेंच याही बाबतींत. विलायतेंत कोठें कोठें 'मॉनिटर्स कौन्सिल' किंवा 'प्रिफेक्ट सिस्टीम' असते. शालेय पंचायत हा तशाच तऱ्हेचा प्रयत्न आहे.

हेंच नागरिकशास्त्राचें खरेंखुरें शिक्षण. कृति ही शिक्षणाची खरी कसोटी! नागरिकशास्त्राचा नुसता पुस्तकी अभ्यास करावयाचा नाहीं, तर खरोखर आदर्श नागरिक होण्याचा प्रयत्न करावयाचा! आजचीं मुलें तींच उद्यांचीं मोठीं माणसें! तेच उद्यांचे नागरिक! लहानपणाच्या सवयी तोच मोठेपणचा स्वभाव! बाळपण हाच पुढील आयुष्याचा पाया. पुढील आयुष्यांत उपयोगी पडणाऱ्या सर्व गोष्टींची सुरुवात लहानपणींच होत असते. आजच्या शालेय पंचायतींतलेच सभासद मोठेपणीं ग्रामपंचायतीचे अथवा शहर म्युनिसिपालिटीचे सभासद होतील त्या दृष्टीनें बाळपणाचें हें शिक्षण अत्यंत उपयोगी व अवश्य आहे. शालेय पंचायत अथवा 'बालराज्य' ही स्थानिक स्वराज्याची अथवा लोकराज्याची छोटीशी प्रयोगशाळा, असें म्हणतां येईल.

---

**अभ्यास :** (१) शालेय पंचायत म्हणजे काय? (२) निवडणूक म्हणजे काय व ती कशी करतात? (३) गुप्त मतदान म्हणजे काय व तें करण्याची

गरज काय ? (४) मतदाराचें कर्तव्य काय ? (५) प्रतिनिधींची जबाबदारी काय ? (६) शालेय पंचायतीचीं कामें कोणतीं ? (७) शालेय पंचायत स्थापण्यांत हेतु कोणता ? (८) शालेय पंचायत ही लोकराज्याची छोटी प्रयोगशाळा कशी तें स्पष्ट करून सांगा.

---

## ६. भोंवतालच्या भागाची स्वच्छता व संरक्षण

शाळेंत पंचायतीची स्थापना झाल्यामुळें शाळेंतील मुलांना इतर ठिकाणींही अशाच तऱ्हेचीं मंडळें बनवून काम करण्याची इच्छा उत्पन्न झाली व उत्तेजन मिळालें. घरींदारीं एकमेकांशीं मिळून मिसळून व कामाची वाटणी करून त्यांनीं काम करण्याचें ठरविलें. एका घरांतलीं भावंडेंसुद्धा एकानें स्वच्छता, दुसऱ्यानें नीटनेटकेपणा, तिसऱ्यानें बागबगीचा, चौथ्यानें बाजार अशी वाटणी करून कामें करूं लागलीं. काम करण्याची आवड व हौस वाढूं लागली. आळस जात चालला. भांडणें कमी होऊं लागलीं.

हा उत्साह नुसता घरांत राहिला नाहीं; तो बाहेरही पसरूं लागला. संघ करण्याची व संघटित काम करण्याची इच्छा बळावूं लागली. अशा पद्धतीनें काम करण्याचे फायदे मुलांना पटूं लागले. 'एकी हें बळ' हें तत्त्व त्यांना समजलें. व्यक्तीला करतां येत नाहीं तें संघाला करतां येतें. संघ ही शक्ति आहे, संघ करून काम करण्यानें परस्पर स्नेह व साह्य आणि सहकार्य वाढतें या सर्व गोष्टींचा त्यांना अनुभव येऊं लागला. त्यांना सामाजिक दृष्टि येऊं लागली व सार्वजनिक कामाची त्यांची उत्सुकता वाढूं लागली.

आजूबाजूच्या दहावीस घरचीं मुलें रोज शाळेंतून घरीं आल्यावर एकत्र जमूं लागलीं. क्रिकेट वगैरे खेळ खेळूं लागलीं. त्यांनीं आपल

'क्लब, स्थापन केला. 'कॅप्टन,' 'व्हाइस कॅप्टन,' 'सेक्रेटरी' खजिनदार निवडले. बहुमतानें मासिक वर्गणी ठरविली. इतर क्लबांशीं ते सामने देऊं लागले. प्रत्येकजण स्वतःपेक्षां संघावर अधिक प्रेम करूं लागला. संघाच्या दृष्टीनें विचार करूं लागला.

खेळाच्या संघाचें काम चांगलें चालूं लागल्यानंतर त्यांना कांहीं तरी काम करण्यासाठीं सघ स्थापावा अशी इच्छा उत्पन्न झाली. सर्वांच्या फायद्याचें असें कांहीं तरी संघटित काम करावें असें वाटूं लागलें. मुलें तीं ! त्यांची हौस मोठी ! त्यांचा उत्साह दांडगा ! रोज सर्वांनीं जमून व विचार करकरून शेवटीं तीं सर्वजण राहात होतीं त्या भागापुरता त्यांनीं एक लहानसा 'बालमित्रसंघ' स्थापन करण्याचें ठरविलें. त्यांनीं आपली ही कल्पना घरांतल्या वडील मंडळींना सांगितली व त्यांचाही सल्ला घेतला. वडील मंडळींनीं बाळगोपाळांची थोडी थट्टा केली, पण त्याबरोबरच त्यांचें कौतुकही केलें; त्यांना उत्तेजन दिलें.

"एकूण तुम्ही सगळे बाबालोक सार्वजनिक काका होणार तर ! समाजसेवासंघच स्थापणार तुम्ही आणि बडे समाजसेवक होणार. होय ना ?"

"बडे नाहीं, छोटे ! आम्ही छोटे, आमचा संघ छोटा, आमची सेवाही छोटी !"

"हरकत नाहीं. मुलांनो, आजची छोटीही उद्यां मोठी होईल. करा स्थापन तुमचा संघ. केव्हां केव्हां लहान मुलें करूं शकतात तें मोठ्या माणसांच्या हातून होत नाहीं. तुम्हांला आमचें पूर्ण पाठबळ आहे."

सगळी जमवाजमव झाली व एके दिवशीं मुलांच्या 'बालमित्रसंघा'ची स्थापना करण्यांत आली. संघाचा उद्देश जरी अगदीं लहानशा प्रमाणावर 'समाजसेवा' करण्याचा असला, तरी 'समाजसेवासंघ'

असें मोठें नांव त्यांनीं मुद्दाम घेतलें नाहीं. वर्गणी देऊन सर्व मुलांनीं आपणांस संघाचे पहिले सभासद म्हणून नोंदून घेतलें. नंतर सभासदांची पहिली सभा होऊन संघाचें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें. अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार, वगैरे ठरले. त्यानंतर संघानें काय काय करावयाचें याविषयीं वादविवाद झाला व शेवटीं बहुमतानें सुरुवातीस पुढील कार्यक्रम हातांत घेण्याचा ठराव मंजूर झाला. ( १ ) आजूबाजूच्या भागाची स्वच्छता व संरक्षण, ( २ ) मुलांच्या खेळांची व करमणुकीची योजना, ( ३ ) करमणुकीचे सामाजिक कार्यक्रम, ( ४ ) निरनिराळे उत्सव साजरे करणें, ( ५ ) स्वयंसेवकांचें पथक उभारणें.

हा कार्यक्रम मुलांच्या आवाक्याबाहेरचा नव्हता व तो कंटाळवाणा अगर त्रासदायकही नव्हता. त्यामुळें तो सर्वांना फार आवडला व लहानमोठ्या सर्व मंडळींनीं त्याबद्दल समाधान व्यक्त केलें. सर्व कार्यक्रम एकदम सुरू करावयाचा नव्हता. एकाची नीट सुरुवात झाली म्हणजे मग दुसरें, असें कामाचें धोरण ठरविण्यांत आलें व वर दिलेल्या क्रमानें कामें करावयाचें ठरलें.

कार्यक्रमांत ‘ आजूबाजूच्या भागाची स्वच्छता व संरक्षण ’ या गोष्टीला पहिली जागा दिली होती. तेव्हां तें काम प्रथम हातांत घेण्याचें ठरलें. कार्यकारी मंडळानें त्यासाठीं सभासदांमधून एकाची मुख्य म्हणून निवड केली व त्याच्या मदतीसाठीं सभासदांतून तिघांची पोटकमिटी नेमण्यांत आली. पोटकमिटीची सभा होऊन कामाची दिशा ठरविण्यांत आली. पोटकमिटीच्या मुख्यानें स्वच्छता व संरक्षण या बाबतींत त्या भागाच्या कामावर सर्वसाधारण देखरेख करण्याचें ठरलें. सभासदांपैकीं एकानें सकाळीं व दुसऱ्यानें संध्याकाळीं तेवढ्या भागांत एक फेरी मारण्याचें व कोठें केरकचरा अथवा घाण दिसली तर ती काढून टाकण्याची व्यवस्था

करण्याचें ठरलें. रस्त्यावर घाण साचलेली दिसली, नळ फुटला अगर मोरी तुंबली तर त्याची बातमी ताबडतोब म्युनिसिपालिटींत देण्याचें ठरलें.



लढाईच्या दिवसांत हवाई हल्ल्याच्या भीतीनें लोक शहर सोडून जातात. त्यामुळें वस्ती कमी होते व दरोडेखोरांना फावतें. रात्रीं 'ब्लॅक आउट' (दिवाबंदी) असल्यामुळें चोरट्यांना मदत होते. चोऱ्यामाऱ्या फार होतात, त्यासाठीं रात्रीं थोडा वेळ–दहा वाजेपर्यंत–मुलांना रक्षकांचें व गस्त घालण्याचें काम करतां येईल. म्हणून त्या कामासाठीं चार चार मुलांचे गट नेमण्यांत आले व त्यांना आळीपाळीनें रात्रीं पहाऱ्याचें काम देण्यांत आलें. संरक्षणदळ स्थापण्यांत आलें. मुलांना चोराचा प्रतिकार करतां येणें शक्य नसलें, तरी चोराची चाहूल लागतांच ओरड करण्याचें काम तीं करूं शकतात. अशी ओरड करून त्यांनीं चार–दोन भामट्यांना पळवलेंही. हें काम करण्यास मुलें एकटीं तयार होईनात, परंतु टोळींत काम करण्यास एका पायावर तयार! किती तरी मुलें आनंदानें पुढें

आलीं. याचा एक परिणाम असा झाला कीं मुलांचा भित्रेपणा कमी झाला व तीं धीट होऊं लागलीं. आत्मविश्वासानें व धडाडीनें कामें करूं लागलीं, कर्तबगार होऊं लागलीं.

बाळगोपाळांचा पहिला उपक्रम इतका यशस्वी झाल्यामुळें वडील मंडळींनीं त्यांचें कौतुक केलें. मुलांनाही मूठभर मांस चढल्यासारखें वाटलें. दुप्पट उत्साहानें काम करण्याची त्यांना उमेद आली. त्यांचा आशावाद वाढला व मूळच्या कार्यक्रमांतील पुढल्या गोष्टींना हात घालण्याची भाषा तीं बोलूं लागलीं. वडील मंडळींचा सल्ला व साह्य त्यांना प्रत्येक बाबतींत होतेंच. किंबहुना मुलांच्या सर्व हालचालींवर त्यांचें लक्ष असेच. वडिलांचा उपदेश व लहानांचा उत्साह हीं दोन्ही एकत्र आल्यामुळ 'बालमित्रसंघाचें' कार्य दिवसेंदिवस अधिकाधिक नियमित व नमुनेदार होऊं लागलें.

---

**अभ्यास** : (१) शालेय पंचायतीचा मुलांच्या घरच्या जीवनावर काय परिणाम झाला ? (२) खेळाच्या क्लबाची कल्पना कशी निघाली ? (३) 'बालमित्रसंघा' ची स्थापना कशाकरतां करण्यांत आली ? (४) बालमित्रसंघानें कामाचा कोणता कार्यक्रम आपल्यापुढें ठेविला ? (५) लहान मुलांकडून समाजसेवा कितपत होणें शक्य आहे ? (६) समाजसेवासंघाचें काम करण्यांत मुलांना कसलें शिक्षण मिळतें ? त्यांना कसल्या सवयी लागतात व त्यांच्या स्वभावावर काय परिणाम होतो ? (७) तुमचा एखादा सेवासंघ आहे का ? असल्यास तुम्ही त्यांत काय काम करतां ?

---

## ७. लहान मुलांसाठीं खेळ व करमणुकीची योजना


बालमित्रसंघाची स्थापना होऊन थोडेच दिवस झाले असतील, परंतु त्या अवधींत त्याचा पुष्कळ बोलबाला झाला. जिकडे तिकडे तो एक कौतुकाचा विषय होऊन बसला. त्या संघाची स्थापना करून मुलांनीं सार्वजनिक कार्याची दीक्षाच घेतली, असें मोठ्या माणसांना वाटूं लागलें.

'हीं लहान मुलें काय करणार ?' असें वाटणाऱ्या कांहीं लोकांना मुलांनीं आपल्या उत्साहानें व चिकाटीनें चकित करून सोडलें. त्यांच्या वयाच्या, शक्तीच्या व समजुतीच्या मानानें पाहातां त्यांनीं सुरू केलेलें कार्य खरोखरच आश्चर्य वाटण्यासारखें होतें. 'स्वच्छता व संरक्षण' हें काम सुरळीतपणें चाललें आहे, असें दिसतांच संघानें पुढचें काम हातीं घेण्याचें ठरविलें. तें म्हणजे 'लहान मुलांसाठीं खेळ व करमणुकीची योजना.'

ह्या बाजूला लहान मुलांना एकत्र खेळायला अशी जागा नव्हती. लहान मुलें आपापल्या घरींच खेळत. त्यांना एकत्र आणावें, निरनिराळे खेळ शिकवावे, कवाईत करून घ्यावी, त्यांचा एकलकोंडेपणा घालवावा, त्यांना सामुदायिक दृष्टि व शिस्त शिकवावी, या हेतूनें त्यांनीं त्याच भागांतील एका श्रीमंत गृहस्थाच्या घराच्या बाजूला मोकळी पडलेली एक मोठी जागा त्यासाठीं पसंत केली. संघाच्या कार्यकारी मंडळानें मालकांची गांठ घेतली व त्यांच्यापुढें आपली मागणी ठेवली. मुलांचें हें 'शिष्टमंडळ' पाहून मालकांना मोठें कौतुक वाटलें व त्यांनीं त्यांना आनंदानें परवानगी दिली; इतकेंच नव्हे तर ती जागा त्या बाजूच्या मुलांना खेळण्यासाठीं कायमची बहाल करण्याचें त्यांनीं मनाशीं ठरविलें व त्या जागीं वाटेल त्या सोयी व साधनें करून देण्याचें त्यांनी मुलांना आश्वासन दिलें.

त्या श्रीमंत गृहस्थांच्या औदार्यानें त्या जागेला 'बालक्रीडा' असें नांव देण्यांत आलें व थोड्याच दिवसांत त्याला सभोंवार तारांचें कुंपण घालण्यांत येऊन जमीन सारखी करण्यांत आली व त्यावर त्यांच्याच खर्चानें जंगलजिम्, सी सॉ, घसरगुंड्या, सिंगलबार, डबलबार, मेरी गो राउंड, इत्यादि खेळांच्या सोयी करण्यांत आल्या. त्या श्रीमंत गृहस्थांच्या देणगीचा गौरव करण्यासाठीं वडील मंडळींनीं संघाच्या मुलांना त्या क्रीडांगणाचा उद्‌घाटनसमारंभ करण्यास सुचविलें. तो समारंभ त्यांच्याच अध्यक्षतेखालीं करण्यांत आला. आजूबाजूचे सर्व लोक, लहान मुलें व मोठीं माणसें

हजर होतीं. टाळ्यांच्या गजरांत क्रीडांगण सर्व मुलांना खेळण्याकरितां जाहीररीत्या खुलें करण्यांत आलें. खेळांच्या चढाओढींत जीं मुलें वर येतील त्या त्या मुलांना बक्षिसें देण्यासाठीं त्या श्रीमंत गृहस्थांनीं दरवर्षीं पंचवीस रुपये देण्याचें जाहीर केलें.



मुलें फारच खूष झालीं. संघाच्या सभासदांना व कार्यकारी मंडळाला तर आकाश ठेंगणें वाटूं लागलें; आणि बरोबरच आहे. त्यांच्या प्रयत्नाला असें कल्पनेबाहेर यश आल्यावर त्यांना हर्षवायु झाल्यास नवल नाहीं. त्यांना आतां काय करूं आणि काय नको असें होऊन गेलें. प्रथमतः त्यांनीं एक कमिटी नेमून त्यावर कार्यकारी मंडळाचा एक सभासद तिचा मुख्य म्हणून नेमला. त्या कमिटीनें घरोघर जाऊन प्रत्येक घरांतील लहान मुलांमुलींची यादी केली व घरच्या सर्व वडील मंडळींना रोज संध्याकाळीं मुलें क्रीडांगणावर पाठविण्याची विनंति केली. लहान मुलें जाण्यास एका पायावर तयार झालीं व पालकांनींही त्यांना संमति दिली.

दररोज संध्याकाळीं पन्नास पाऊणशें लहान मुलें क्रीडांगणावर जमूं लागलीं. मुलांच्या खेळण्याबागडण्यामुळें त्या जागेला फार शोभा आली. संघाचा एकेक सभासद तेथें आळीपाळीनें देखरेख करण्यासाठीं व सामुदायिक खेळ व कवाईत शिकविण्यासाठीं रोज तेथें येई. थोडा वेळ कवाईत करून घ्यावी, बाकीचा वेळ निरनिराळे खेळ खेळावे अशी व्यवस्था झाली. पळापळी, लंगडी, लपंडाव, सशाच्या उड्या, शिवाशिवी, मगर आणि माणूस, कुत्रा, आणि कोल्हा, वगैरे सर्व खेळ मुलं खेळूं लागलीं. शिस्तीनें उभें राहून कवाईत करूं लागलीं. रोज वेळच्या वेळीं सगळीं तोंड धुऊन व स्वच्छ कपडे घालून येऊं लागलीं. याचा परिणाम असा झाला, कीं मुलांचा वेळ तर आनंदांत जाऊं लागलाच व त्यांना निरनिराळे खेळ व कवाईत येऊं लागलीच, परंतु त्याचबरोबर तीं आपोआप अधिक हुशार, चलाख, धीट, सशक्त, आनंदी व उत्साही होऊं लागलीं. शिस्तीनें वागायचें व खेळीमेळीनें राहायचें त्यांना समजूं लागलें. त्यांचा हट्ट व हेकेखोरपणा कमी होऊं लागला. त्यांच्या अंगीं नियमितपणा व आज्ञाधारकपणा येऊं लागला. क्रीडांगणावर मुलें नुसतीं खेळ खेळायला येत नव्हतीं, तर तीं अप्रत्यक्षपणें नीट वागायलाही शिकत होतीं. खेळ खेळतां खेळतां खेळाडू वृत्ति शिकत होतीं.

लहान मुलांच्या रोजच्या खेळाप्रमाणें त्यांच्या इतर करमणुकीची योजनाही त्याच जागीं करण्याचा बेत 'बालमित्रसंघाचीं मुलें' करीत होतीं. लहान मुलांना एकच गोष्ट प्रिय असते व ती म्हणजे खेळ! शारीरिक खेळांप्रमाणेंच इतर खेळही त्यांना फार आनंद देतात. या दृष्टीनें त्यांच्या आनंदांत भर टाकण्याकरितां दर आठवड्यांतून एकदां करमणुकीचा एक छोटा कार्यक्रम करण्याचें ठरलें. तो काय करावा याविषयीं खूप चर्चा झाली व शेवटीं पुढील गोष्टी ठरविण्यांत आल्या. (१) सृष्टिशोभा पाहाण्यासाठीं जवळच्या सहली काढणें, (२) मुलांचे गाण्याभाषणाचे

प्रयोग करणें किंवा बाहेरच्या माणसाचें काव्यगायन करणें, ( ३ ) मधून मधून केव्हांतरी एखादा पोवाडेवाला बोलावून त्याचे ऐतिहासिक पोवाडे मुलांना ऐकविणें, ( ४ ) कधीं बाहेरच्या माणसाचे जादूचे प्रयोग करणें, (५)कधीं एखाद्या गारुड्याला किंवा डोंबाऱ्याला खेळ करावयाला बोलावणें (६) खेळाचे सामने करणें, (७) रेडिओचा मुलांचा कार्यक्रम ऐकविणें अथवा मुलांनीं पाहावयास योग्य असा एखादा चित्रपट पाहाणें, ( ८ ) वस्तुसंग्रहालय अथवा पशुसंग्रहालय बघावयास जाणें, इत्यादि योजना ठरल्याबरोबर तिची अंमलबजावणीही सुरू झाली.

लहान मुलांच्या दृष्टीनें पाहातां वरील गोष्टी पुरेशा होत्या. त्यांत विविधता होती. लहान मुलांना एकाच गोष्टीचा कंटाळा येतो. त्यांना रोज कांहीं तरी नवें हवें. रोजच्या जीवनांत मधून मधून होणारा हा फरक त्यांना फारच पसंत पडे. त्या दिवशीं त्यांना विशेष आनंद व हुरूप वाटे. तीं त्यांत मोठ्या उत्साहानें व ईर्षेनें भाग घेत. करमणुकीचे निरनिराळे कार्यक्रम मनोरंजक, तसेच थोडेफार बोधप्रदही होत. मनोरंजन होत असतांना मुलांचें एक प्रकारचें शिक्षणही होत असे ! लहान मुलांच्या सौंदर्यदृष्टीची जोपासना होऊं लागली. त्यांचें विविध ज्ञान वाढूं लागलें. त्यांच्या कल्पनाशक्तीला अवसर मिळूं लागला. कौशल्याचें बीज होऊं लागलें. पूर्वजांचे पराक्रम ऐकून त्यांची कर्तृत्वशक्ति जागृत झाली. त्यांचें स्वदेशप्रेम वाढीला लागलें ! हे सर्व चांगले परिणाम होत असल्याची जाणीव नव्हती हें खरें, तथापि त्यांच्या मनावर हे परिणाम होत होते हेंही तितकेंच खरें ! मुलें खेळत होतीं, परंतु खेळत असतांनाच तीं शहाणीं व समजूतदार होत होतीं. शिक्षण शाळेंतच नसतें, शाळेबाहेरही असतें. घरीं, दारीं, क्रीडांगणावर शिक्षण चालू असतें व मुलें शिकत असतात. शिक्षण सारखें चालू असतेंच.

---

**अभ्यास :** ( १ ) बालमित्रसंघाचें काम कसें काय चाललें होतें ? ( २ ) 'स्वच्छता व संरक्षण' ह्यानंतर त्यांनीं कोणतें काम हातीं घेण्याचें ठरवलें ?

( ३ ) क्रीडांगणाच्या बाबतींत त्यांना कोणाची मदत झाली व ती मदत काय होती ? ( ४ ) लहान मुलांच्या खेळाची काय काय व्यवस्था करण्यांत आली ? ( ५ ) लहान मुलांच्या करमणुकीसाठीं काय काय गोष्टी करावयाचें ठरविलें ? ( ६ ) सामुदायिक खेळांचा लहान मुलांच्या स्वभावावर काय परिणाम होतो ? ( ७ ) करमणुकीचे कार्यक्रम ठेवण्याचे फायदे कोणकोणते ? ( ८ ) 'क्रीडांगणावर मुलांचें शिक्षण चालू असतें' ह्याचा अर्थ काय ?

---

# ८. मुलें आणि प्रौढ लोकांच्या करमणुकीची संघटना

प्रयत्नांना यश आलें व उत्साहाला उत्तेजन मिळत गेलें म्हणजे उत्साह अधिकच वाढतो व प्रयत्न करण्यासही दुप्पट जोर येतो. बालमित्रसंघाच्या बाबतींतही तोच अनुभव आला. जें जें काम त्यांनीं हातांत घेतलें तें तें अत्यंत यशस्वी रीतीनें होऊं लागल्यामुळें त्यांचा आत्मविश्वास बळावला व अधिक काम करण्याला त्यांना हुरूप आला. लहान मुलांच्या खेळांची व करमणुकीची सोय झाली, तेव्हां त्यांना बरोबरीच्या मुलांसाठीं व शक्य झाल्यास वडील मंडळींच्या करमणुकीसाठीं कांहीं तरी करावें असें वाटूं लागलें व या दिशेनें त्यांचे विचार सुरू झाले.

संघाच्या सभासदांकडून सूचना मागविण्यांत आल्या. त्या सगळ्यांचा कार्यकारी मंडळाच्या सभेंत विचार होऊन कांहीं मान्य करण्यांत आल्या. कांहीं नव्या सूचना करण्यांत आल्या व शेवटीं बऱ्याच वादविवादानंतर पुढील योजना निश्चित करण्यांत आली. मोठ्या मुलांच्या करमणुकीसाठीं ( १ ) लांबलांबच्या सहली काढणें, ( २ ) ऐतिहासिक महत्त्वाचे किल्ले

अथवा इतर प्रेक्षणीय स्थळें पाहाण्यास जाणें, ( ३ ) वादविवादमंडळ स्थापन करून त्यातर्फे आठवड्याला मुलांच्या आवडीच्या व मुलांना उपयुक्त अशा विषयाची चर्चा करणें व भाषण करण्यास शिकणें, ( ४ ) मुलांच्या कल्पनेला, विनोदबुद्धीला आणि लेखन व चित्रकला यांतील कौशल्याला वाव देण्यासाठीं हस्तलिखित 'मुलांचें' मासिक काढणें, ( ५ ) विविध 'बालवाङ्मय' असलेलें मुलांचें वाचनालय काढणें, ( ६ ) क्रिकेट क्लबतर्फे पंधरवड्याला मित्रत्वाचे सामने करणें, ( ७ ) दर महिन्याच्या शेवटीं छोटीं नाटकें, गायनवादन, नकला, अशा तऱ्हेचे मुलांचे मनोरंजक कार्यक्रम करणें, प्रसंगीं बाहेरच्या मुलांना बोलावणें. वरील गोष्टींपैकीं प्रत्येक नीट तऱ्हेनें व्हावी म्हणून संघाच्या सभासदांतून त्या त्या कामाला लायक अशा मुलांना त्या त्या विभागाचे व्यवस्थापक म्हणून नेमण्यांत आलें. त्यांनीं आपल्या मदतीला सभासदांमधून त्यांना योग्य वाटतील अशांना 'स्वयंसेवक' म्हणून घ्यावें, अशी त्यांना परवानगी देण्यांत आली. कॅप्टन, लायब्ररिअन्, सेक्रेटरी, संपादक, इत्यादि विभाग-व्यवस्थापकांची निवड झाली. कार्यकारी मंडळाच्या साधारण देखरेखीखालीं त्यांच्या कामाला सुरुवात झाली.

निरनिराळ्या कार्यक्रमांसाठीं अगोदर एका महत्त्वाच्या गोष्टीची अत्यंत जरूर होती व ती म्हणजे संघाचें सभागृह. प्रथम कांहीं दिवस संघाच्या सभा कोणाच्या तरी घरीं भरत असत. परंतु संघाच्या कामाचा व्याप जसजसा वाढूं लागला, तसतशी सभागृहाची वाण विशेष भासूं लागली. ती दूर करण्यासाठीं कार्यकारी मंडळानें नाक्यावर राहाणाऱ्या एका धनाढ्य व्यापाऱ्याकडे 'शिष्टमंडळ' नेण्याचें ठरविलें. व्यापाऱ्याचें मोठें थोरलें घर होतें. त्यांत मोठेमोठे तीन चार हॉल होते. त्यांत जो थोडा अलग होता, त्यासाठीं त्यांनीं मागणी केली. व्यापाऱ्याच्या घरीं तो व त्याची बायको हीं दोनच माणसें! त्यांना मूलबाळ कोणी नव्हतें. घराचा पुष्कळस









भाग मोकळा पडूनच असल्यामुळें व विशेषतः ती लहान मुलांची मागणी असल्यामुळें त्या दोघांनाही मुलांना नाहीं म्हणवेना. बालमित्रसंघाचीं मुलें त्यांच्या मगदुराप्रमाणें का होईना, पण काय तऱ्हेचें सार्वजनिक कार्य करीत होतीं याचीही वार्ता त्यांच्या कानांवर गेली होतीच. त्यांनीं मुलांच्या अंगावरून प्रेमानें हात फिरविला व ' आमच्या घरीं मुलं नाहींत, तेव्हां तुम्हीच आमचीं मुलं. तुम्हाला हवा तो हॉल घ्या व तुम्हांला लागेल तें काम तेथें करा ' असें म्हणून त्यांनीं परवानगी दिली.

मुलांचा आनंद गगनांत मावेना. त्या आनंदाच्या भरांत त्यांनीं भराभर करमणुकीच्या योजनेंतील सर्व गोष्टी सुरू केल्या. त्या महिन्यांतच ' शिवनेरी ' ची सहल झाली, खडकवासल्याचें धरण बघून झालें, वंडगार्डनची फेरी झाली, गायनवादनाचा कार्यक्रम झाला. मुलांचें वाचनालय सुरू झालें. त्यासाठीं प्रत्येक घरीं जाऊन मुलांनीं जवळजवळ दोनअडीचशें पुस्तकें गोळा केलीं व मुलांचें ' बालमासिक ' ही सुरू झालें. पहिल्याच अंकांत गोष्टी, गाणीं, चुटके, चरित्रें, चित्रें व छोटे निबंध होते. मुलांनीं त्यासाठीं खूपच परिश्रम घेतले होते.

बाळगोपाळांच्या या वाढत्या उद्योगाचें वडील मंडळींनींही अतिशय कौतुक केलें. तीं त्यांना सर्व तऱ्हेची मदत करीत व त्यांच्या सर्व कामकाजावर लक्ष ठेवीत. त्यांचें चुकेल तेथें त्यांना सुधारून द्यावयाचें व अडेल तेथें त्यांना नीट वाट दाखवायची, अशा तऱ्हेनें वडील मंडळी वागत असत. मुलांच्या करमणुकीच्या कार्यक्रमानें केवळ मुलांची करमणूक होत होती असें नाहीं, तर मोठ्या माणसांनाही ती घटकाभर करमणूक वाटे. लहान मुलांचे कार्यक्रम मोठ्या मंडळींनाही फार आवडत. तसेच हळुहळू लहान मुलांच्या करमणुकीच्या हॉलमध्यें मोठ्या माणसांच्या करमणुकीचेही कार्यक्रम होऊं लागले. अर्थात् पुष्कळसे रात्रीं होत. कधीं गवयाचें

गायन, कधीं सतार अथवा बीनवादन, कधीं कथाकीर्तन, कधीं पुराण-प्रवचन, कधीं व्याख्यान अशा तऱ्हेचे मोठ्या माणसांसाठींही कार्यक्रम तेथें होऊं लागले. त्या वेळीं मुलांचा प्रत्यक्ष भाग त्यांत कांहीं नसला, तरी तीं स्वयंसेवक म्हणून, येतील त्या स्त्रीपुरुषांस नीट बसविण्याचें आणि कार्यक्रमाच्या वेळीं शिस्त व शांतता ठेवण्याचें काम योग्य तऱ्हेनें बजावीत. मोठ्या मंडळींनीं वर्षांतून एखादे वेळीं नाटक वगैरे बसविलें, तर त्यांतही बारीक सारीक कामें मुलें करीत. एकंदरीत काय, कीं बालमित्रसंघाचे सभासद नुसते मुलांसाठींच झटत नव्हते, तर थोडे फार मोठ्या मंडळीं-साठींही होईल तें करीत होते. याचा एक परिणाम असा झाला कीं मुलें व मोठीं माणसें वारंवार एकत्र येऊं लागलीं. मोठ्या माणसांना मुलांची व मुलांना मोठ्या माणसांची अधिकाधिक ओळख होऊं लागली. परस्परांचे स्वभावविशेष परस्परांना नीट समजूं लागले. मोठीं माणसें मुलांवर अधिकार गाजविण्याऐवजीं प्रेमानें वागूं लागलीं व मुलांना वडील मंडळीं-विषयीं भीति वाटायची नाहींशी होऊन आदर वाटूं लागला. शिस्तीसाठीं शिक्षेऐवजीं समजुतीची अधिक आवश्यकता आहे हें वडील मंडळींना पटूं लागलें.

नवीन योजनेचा मुलांवर दुसराही चांगला परिणाम झाला. योजनेच्या निरनिराळ्या अंगावर थोडाफार खर्च करणें अवश्य झाल्यानें ज्या मुलांच्या ताब्यांत त्या गोष्टी दिल्या होत्या, त्यांना त्यांच्या स्वाधीन केलेल्या पैशाचा जमाखर्च लिहिणें व हिशेब ठेवणें जरूर होऊं लागलें. नवीन नवीन सोयी व सवलती नीट चालण्यासाठीं संघाची मासिक फीही १२ पैशांऐवजीं २५ पैसे करण्यांत आली. सभासदांच्या फीची रक्कम व कोणी देणग्या म्हणून दिलेली रक्कम हें संघाचें ‘ उत्पन्न ’ झालें. उत्पन्नाच्या प्रश्नाबरोबर खर्चांचा व शिलकेचा अथवा तुटीचा प्रश्न उपस्थित झाला. कोण-कोणत्या खात्यावर किती किती खर्च करायचा हें आगाऊच ठरविण्यासाठीं

अंदाजपत्रक करण्याची इष्टता वाटूं लागली. जमाखर्चाची तोंडमिळवणी नीट होण्यासाठीं हिशेबतपासनीस नेमण्यांत आले. वडील मडळींना वरचेवर हिशेब दाखविण्याचें ठरलें. अशा रीतीनें शाळेंतील पुस्तकी शिक्षणाला घरीं अशी प्रत्यक्ष व्यवहार करण्यास शिकण्याची जोड मिळाली. पुस्तकी माहिती प्रत्यक्ष कृतींत आणण्याची संधि मिळाली. मुलांना खरें शिक्षण मिळूं लागलें. तीं खरोखर शहाणीं होऊं लागलीं. जसजसा कामाचा बाहेरचा व्याप वाढूं लागला, तसतशा कामाच्या पद्धतीही अधिक सुधाराव्या लागल्या व कामांत व्यवस्थितपणाही अधिक आणावा लागला. प्रथम प्रथम मुलांना थोडें जड गेलें, त्यांच्या चुका झाल्या, परंतु अनुभवानें तीं शहाणीं झालीं व आपलें काम वेळच्या वेळीं व व्यवस्थितपणें करूं लागलीं. सार्वजनिक कार्याचीं मूळाक्षरें तीं घटवूं लागलीं. स्थानिक स्वराज्याचीं मूलतत्त्वें तीं प्रत्यक्ष आचरणांत आणूं लागलीं.

---

**अभ्यास :** ( १ ) मोठ्या मुलांच्या करमणुकीची काय योजना ठरविण्यांत आली ? ( २ ) त्यासाठीं कोणत्या गोष्टीची आवश्यकता होती ? ( ३ ) त्या बाबतींतील अडचण मुलांनीं कशी दूर केली ? ( ४ ) मुलांनीं नुसती योजना केली; कीं ती अंमलांत आणली ? ( ५ ) मोठ्या माणसांचे करमणुकीचे कार्यक्रम कोणते ? ( ६ ) त्यांत मुलांचा काय भाग होता ? ( ७ ) नवीन योजनेचा मुलां-वर व मोठ्या माणसांवर काय परिणाम झाला ? ( ८ ) कामाचा व्याप अधिक तितका त्यांत व्यवस्थितपणा आवश्यक कां, तें सांगा. ( ९ ) करमणुकीच्या कार्य-क्रमांत तुम्ही कोणता भाग घ्याल ?

---

## ९. राष्ट्रीय आणि हंगामी उत्सवांत भाग घेणें

बालमित्रसंघाची स्थापना होऊन आतां बरेच दिवस झाले. या अवधींत त्याची संघटना उत्तम प्रकारें होऊन त्याचें कार्यही जितकें विविध, तितकें व्यवस्थित असें चाललें होतें. संघ स्थापन करण्याचा मुख्य हेतु

समाजसेवेचा, लोकांच्या उपयोगी पडण्याचा, लोककार्य करण्याचा व सामाजिक दृष्टीनें बघण्याचा होता. घरांत काय अगर घराबाहेर काय, मुलें काय अथवा मोठीं माणसें काय, एकटीं राहात नसतात. इतर मंडळींच्या बरोबर राहातात. घरांत घरांतलीं माणसें असतात; बाहेर बाहेरचीं माणसें असतात. मुलांना काय किंवा मोठ्या माणसांना काय, बरोबरीच्या माणसांत वागावें लागतें. शाळेंत मुलांना इतर मुलांशीं जमवून घ्यावें लागतें. मोठ्या माणसांना आजूबाजूच्या मंडळींशीं पटवून घ्यावें लागतें. एकमेकांशीं समजुतीनें व सलोख्यानें राहावें लागतें. घटके-घटकेला इतरांशीं संबंध येतो. त्यांची जरुरी लागते, त्यांच्याबरोबर काम करावें लागतें. यामुळें आपण स्वतःपुरताच विचार न करतां इतरांचा विचार करूं लागतों; स्वतःचेंच हित अथवा सोय न पाहातां इतरांच्याही सुखाचा व सोयीचा विचार करतों. याचाच अर्थ, आपल्याला हळूहळू सामुदायिक अथवा सामाजिक दृष्टि येतें. स्वतःऐवजीं सर्वांच्या दृष्टीनें बघणें याचेंच नांव सामाजिक दृष्टि ! एकाच्या हितापेक्षां अनेकांच्या हिताचा विचार, स्वतःसाठीं काम करण्याऐवजीं सर्वांसाठीं काम करणें हीच समाजसेवा !

आपण स्वतः ही एक व्यक्ति ! आपल्यापेक्षां आपलें कुटुंब मोठें ! घरांतील सर्व मंडळी मिळून कुटुंब होतें. कुटुंबापेक्षां समाज मोठा; अनेक कुटुंबें मिळून समाज तयार होतो. समाजापेक्षां देश अथवा राष्ट्र मोठें, कारण निरनिराळे समाज मिळून राष्ट्र होतें. आपलें पहिलें कर्तव्य स्वतःविषयीं, दुसरें कुटुंबांतल्या मंडळीविषयीं, तिसरें समाजाविषयीं व चौथें राष्ट्राविषयीं. हीं चारी कर्तव्यें काय व तीं कशीं करावयाचीं याचें शिक्षण हेंच नागरिक-शिक्षण !

स्वानुभव हाच शिक्षणाचा खरा मार्ग ! याच दिशेनें बालमित्रसंघाचें समाज-शिक्षण अथवा नागरिक-शिक्षण होत होतें. त्यांचें शिक्षण होत होतें त्याप्रमाणें त्यांच्या कुवतीप्रमाणें त्यांच्याकडून अल्पप्रमाणावर का होईना

कि. ५१ ... बा. वा. ...

समाजसेवाहि होत होती. ‘ थेंबें थेंबें तळें सांचे ’ म्हणतात, त्याप्रमाणें मुलांचें थोडें थोडें काम एकंदरीनें पाहातां पुष्कळच उपयुक्त असें होतें.

मुलांचा उत्साह दांडगा, त्यांची उडी फार मोठी ! त्या भागांतल्या लोकांपुरतें काम करून त्यांचें समाधान होईना. बालमित्रसंघाचें कार्यक्षेत्र त्यांना अपुरें वाटूं लागलें. याहून अधिक महत्त्वाचें व जबाबदारीचें काम करण्याची संधि मिळावी, असें त्यांना वाटूं लागलें. आपल्या संघशक्तीचा उपयोग थोडातरी समाजकार्यासाठीं व देशकार्यासाठीं व्हावा असें त्यांना वाटूं लागलें. त्यासाठीं त्यांनीं आपलें ‘ स्वयंसेवक पथक’ उभारलें. त्याला त्यांनीं ‘ बालसेवादल ’ असें नांव दिलें त्यावर पांच संघनायक नेमले व त्यांच्या देखरेखीखालीं त्यांना सांघिक शिस्तीचें शिक्षण दिलें. शिक्षण पुरें झाल्यावर कामाला सुरुवात म्हणून त्यांनीं आपलें सेवादल राष्ट्रीय व सामाजिक उत्सवाच्या वेळीं व्यवस्था ठेवण्यासाठीं, स्वयंसेवकांचें काम करण्यासाठीं पाठविण्याचें ठरविलें. पुरुषांच्या उत्सवांच्या प्रसंगीं मुलांचें व स्त्रियांच्या उत्सवांच्या प्रसंगीं मुलींचें, अशी व्यवस्था करण्यांत आली. सेवादलाच्या मुलांमुलींसाठीं हिंदु लोकांचें धर्मचिन्ह जें स्वस्तिक, तें चिन्ह असलेला निळा-पांढरा गणवेषही ठरविण्यांत आला. सर्व सिद्धता झाली व संघांतील मुलें संधीची वाट पाहात बसलीं.

मुलींच्या बाबतींत ती संधि सुदैवानें लवकरच आली. तो चैत्र महिना होता. घरोघरीं वासंतिक हळदीकुंकू होत होतें. विशेषतः मंगळवारीं व शुक्रवारीं रस्त्यानें बायकांची ही रीघ लागलेली दिसे. बायकामुलींचा काय तो थाटमाट ! हळदीकुंकू असलेल्या घरीं फुलांचा व अत्तरगुलाबाचा काय तो घमघमाट ! गौरीपुढें केवढी ती आरास ! रस्त्यानें जाणाऱ्यायेणाऱ्यांना केवढी गंमत दिसायची ! परंतु यंदा विशेष गोष्ट घडून आली. घरोघर होणाऱ्या खासगी हळदीकुंकवानंतर



शहरच्या सर्व स्त्रियांचें म्हणून एक सामाजिक अथवा सार्वजनिक हळदी-कुंकू करण्याचें ‘महिला समाजांत’ ठरलें. अर्थात् हें हळदीकुंकू फारच मोठ्या प्रमाणावर व्हावयाचें ! त्यासाठीं घरोघर वर्गणी जमा करण्यांत आली. वर्गणी गोळा करण्याचें काम सेवादलाच्या मुलींनीं केलें. खूपच पैसे जमले. आमंत्रणपत्रिका छापून आल्या. त्यांवर पत्ते लिहिण्याचें व नंतर त्या घरोघर पोचविण्याचें कामही दलाच्या मुलींनीं केलें. हळदी-कुंकवाच्या समारंभाच्या दिवशीं शहराच्या मध्यभागीं असलेल्या एका विस्तीर्ण पटांगणांत गौर मांडण्याचें व गौरीपुढें चित्रांची व झाडांफुलांची मोठी आरास करण्याचें कामही सकाळपासून दलांतल्या मुलींनीं जिवापाड मेहनत घेऊन केलें. आजूबाजूची जागाही सुदर रीतीनें शृंगारली. कोच, खुर्च्या बाजूला ठेवून सतरंज्या व गालिचे मधोमध घालण्यांत आले. रंगीबेरंगी कागदाच्या पताका व फुलांचीं तोरणें जागोजागीं लावण्यांत आलीं.हळदीकुंकवाचे चांदीचे करंडे, पानसुपारीचीं चांदीचीं तबकें, ओटी भरण्यासाठीं हरभऱ्याच्या रोवळ्या, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या जमविण्यांत आल्या. अल्पोपहारासाठीं आइस्क्रीम व फळें यांची टेबलें मांडलीं गेलीं. ही पूर्वतयारी झाल्यानंतर हळदीकुंकवाच्या वेळीं गणवेष घालून दलांतील सर्व मुलींनीं तीन तास उभें राहून स्वयंसेविकांचें काम केलें व जाणाऱ्या-येणाऱ्या बायकामुलींची योग्य व्यवस्था ठेविली. सार्वजनिक हळदीकुंकू अत्यंत यशस्वी झालें. वर्तमान-पत्रांत त्याचा पुष्कळ बोलबाला झाला. समाजांत एकी घडवून आणण्याच्या व परस्परांतील स्नेहभाव वाढविण्याच्या दृष्टीनें हा उपक्रम अत्यंत इष्ट व उत्तेजनार्ह आहे, असें त्याचें स्वागत करण्यांत आलें. सेवादलांतील मुलींच्या कामगिरीचा विशेष उल्लेख करण्यांत आला. बालमित्र संघाला खूप प्रसिद्धि मिळाली.

सेवादलांतील मुलांना मात्र कांहीं दिवस, नव्हे कांहीं महिने, वाट पाहावी लागली. कोणत्या तरी मोठ्या उत्सवासाठीं प्रथम बाहेर पडायचें

असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. ती संधि त्यांना विजयादशमी अथवा दसरा या दिवशीं मिळाली. त्या दिवशीं सीमोल्लंघनाच्या निमित्तानें शहरांतल्या लोकांनीं शहरवासीयांचें एक जंगी स्नेहसंमेलन भरविण्याचें ठरविलें. त्यामुहूर्तावर सेवादलांतील मुलांनीं सीमोल्लंघन करण्याचें-एक पाऊल पुढें टाकण्याचें-ठरविलें. त्या स्नेहसंमेलनाच्या तयारीसाठीं व व्यवस्थेसाठीं सेवादलाचें स्वयंसेवक-पथक पाठविण्याचें ठरलें.कार्यक्रमाची सुरुवात देवीच्या देवळापर्यंत जाणाऱ्या जंगी मिरवणुकीनें व्हावयाची होती. 'स्वस्तिक' गणवेशांत स्वयंसेवकांचें पथक अग्रभागीं चाललेलें दिसलें. देवळांत गर्दी मोडण्याचें व शांतता राखण्याचें कामही त्यांनींच केलें. व्याख्यानासाठीं व्यासपीठ व श्रोत्यांसाठीं बसण्याची व्यवस्थाही त्यांनींच केली. व्याख्यात्यांनीच आपल्या भाषणांत धार्मिक सणांचा सामाजिक संघटनेस कसा उपयोग करून घेतां येईल हें दसऱ्याचें उदाहरण घेऊन सांगितलें. दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघन करावयाचें म्हणजे दरवर्षीं मुलांनीं तसेंच मोठ्या माणसांनीं एका पाऊस पुढें टाकावयाचें, कांहीं तरी प्रगति करावयाची हाच खरा दसरा, असा उपदेश केला, बालस्वयंसेवकांच्या शिस्तीची व कामाची त्यांनीं फार तयारी केली.

सामाजिक उत्सवांप्रमाणें राष्ट्रीय उत्सवांतही बालमित्रसंघातर्फे सेवादलांतील मुलें स्वयसेवकांचें काम करूं लागलीं. शिवजयंतीच्या उत्सवाच्या दिवशीं तर मुलांनीं मेहनतीची पराकाष्ठा केली. गांवाबाहेरील टेकडीवर उत्सव साजरा करण्याचें ठरलें. स्वराज्यसंस्थापक श्रीशिवाजीमहाराजांचा संगमरवरी पुतळा तेथें उभारण्यांत आला. भाल्यांची कवाईत तयार करण्यांत आली, शिवाजीमहाराजांचा पोवाडा गाऊन दाखविण्याची व्यवस्था झाली, शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहिणाऱ्या एका मोठ्या देशभक्ताचें व्याख्यान ठरविण्यांत आलें. उत्सव फारच थाटानें साजरा झाला. शकडों लोक टेकडीवर जमले होते. बालस्वयंसेवकांनीं आपली कामगिरी उत्कृष्ट रीतीनें बजावली.

व्याख्यात्यांनीं 'शिवरायातें आठवावें' अशी सुरुवात करून 'शिवाजीचें चरित्र म्हणजे स्वराज्याचा संदेश' या शब्दांनीं आपलें भाषण संपविलें. भाषणांत त्यांनीं शिवाजीचें बालपण मुलांना, तितकेंच मोठेपण मोठ्या माणसांना कसें आदर्श म्हणून पुढें ठेवतां येण्यासारखें आहे तें दाखविलें. स्वदेश व स्वराज्य हें शिवाजीचें ध्येय सर्वांनीं आपल्यापुढें ठेवावें असा त्यांनीं उपदेश केला.

शिवजयंतीप्रमाणेंच तानाजी-दिन, अहल्याबाई-दिन, इत्यादि ऐतिहासिक व्यक्तींचे, तसेंच टिळकजयंति, गांधीजयंति, असे राष्ट्रीय विभूतींचे उत्सव साजरे होऊं लागले. ह्या सर्वांत मुलें मोठ्या उत्साहानें भाग घेत. याचा परिणाम हवा तोच झाला. सार्वजनिक कामाच्या आवडीबरोबर व समाजसेवेबरोबर मुलांची स्वदेशभक्ति व स्वातंत्र्य-प्रीतीही वाढीस लागली.

---

**अभ्यास :** ( १ ) 'समाजसेवासंघ' म्हणजे काय व तो स्थापन करण्याचा हेतु काय ? ( २ ) सामाजिक दृष्टि म्हणजे काय व तिची आवश्यकता काय ? ( ३ ) आपलीं चार कर्तव्यें कोणतीं ? ( ४ ) स्वयंसेवकपथक व सेवादल काढण्याचा उद्देश काय ? ( ५ ) सेवादलांतील मुलांमुलींनीं कोणत्या उत्सवांत भाग घेतला ? त्यांनी काय काय केलें ? ( ६ ) धार्मिक उत्सव, सामाजिक उत्सव अथवा राष्ट्रीय उत्सव ह्यांतला फरक सांगा. दोहोंचीं उदाहरणें द्या. ( ७ ) शिवजयंतीचा उत्सव मुलांनीं कशा रीतीनें साजरा केला ? ( ८ ) निरनिराळ्या उत्सवांत भाग घेण्याचें मुलांच्या मनावर काय परिणाम होतात ? ( ९ ) सार्वजनिक तीळगूळ समारंभ कसा साजरा करतां येईल ? त्यांत मुलें काय करूं शकतील ?

## १०. यात्रा आणि उत्सवांत स्वयंसेवकांचें काम


बालमित्रसंघाच्या सेवादलाचें काम व्यवस्थित तऱ्हेनें चाललें होतें. गांवांत कोणत्याही सार्वजनिक प्रसंगीं सेवादलाचें स्वयंसेवक-पथक हजर असायचें. शिस्त व संघटना यांबद्दल त्यांची विशेष प्रसिद्धि झाली. सोपविलेलें काम चोख रीतीनें बजावणें हा त्यांचा बाणा होता. नम्र भाषा व सभ्य वागणूक हा त्यांचा शिरस्ता होता. संघाच्या व दलाच्या लोकप्रियतेमुळें सभासदांची व स्वयंसेवकांची संख्या दिवसदिवस वाढत होती. संघांत नांव नोंदविणें ही मुलांना एक आनंदाची व अभिमानाची गोष्ट वाटूं लागली. संघातर्फे सार्वजनिक कामाला मदत करणें हा एक प्रकारचा बहुमान वाटूं लागला. कोणाला अधिक काम मिळतें याबद्दल एकमेकांत स्पृहणीय स्पर्धा होऊं लागली. शिस्तीनें वागण्यांत व संघटित कार्य करण्यांत सर्वांना मोठेपणा वाटूं लागला.

सामाजिक व राष्ट्रीय उत्सवांत भाग घेण्याची सवय झाल्यावर धार्मिक उत्सवाच्या व यात्रांच्या वेळींही आपल्याला कांहीं तरी काम करतां येईल असें त्यांना वाटूं लागलें. एकेक दिवसांचे समारंभ यशस्वी रीतीनें पार पाडतां येऊं लागल्यावर, अनेक दिवसांचे उत्सव अथवा यात्राही आपल्याला नीटपणें चालवितां येतील असा विश्वास त्यांना वाटूं लागला व त्यांनीं त्या दृष्टीनें पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें. 'देवासाठीं व देशासाठीं' असें संघानें अलीकडे आपलें ब्रीदवाक्य ठरविलें होतें. संघाच्या व सेवादलाच्या प्रत्येक कामाची सुरुवात 'जन गण मन' ह्या प्रार्थनेनें होऊन शेवट 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीतानें होत असे.

धार्मिक उत्सवांत काम करण्याचा प्रारंभ रामनवमीच्या उत्सवाच्या शुभमुहूर्तावर झाला. वर्षप्रतिपदेपासून रामजन्माच्या दिवसापर्यंत रामाच्या देवळांत दर वर्षी नऊ दिवस मोठा उत्सव असे. नऊ दिवस तेथें

व्यवस्था ठेवण्याचें काम सेवादलाच्या स्वयंसेवकांनीं अंगावर घेतलें पाळीपाळीनें व तुकडीतुकडीनें सकाळपासून रात्रीपर्यंत काम करण्याचें त्यांनीं ठरविलें. कोणी दर्शनास येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना क्रमानें आंत नेण्याची व बाहेर आणण्याची व्यवस्था बघूं लागले. कोणी संध्याकाळच्या पुराणाच्या वेळीं शांतता राखण्याचें काम करूं लागले. कोणी रात्रीं कीर्तनाच्या वेळीं आलेल्या मंडळीस बसविण्याची सोय करूं लागले. कोणी बुक्का लावण्याचें व प्रसाद वांटण्याचें काम अंगावर घेतलें. कोणी कांहीं, कोणी कांहीं, असें काम घेऊन नऊ दिवस उत्सवाची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवली. देवळांतल्या मंडळींनीं, तसेंच बाहेरच्या लोकांनीं लहान मुलांच्या उत्साहाचें व कामाचें फार कौतुक केलें. सवयीनें मुलांचें काम अधिकाधिक शिस्तीनें व सफाईनें होऊं लागलें.सार्वजनिक गणेशोत्सवाच्या वेळीं तर संघाच्या सभासदांना व स्वयंसेवकांना स्वतंत्रपणें व स्वतःच्या जबाबदारीवर काम करण्याला अधिकच अवसर मिळाला. गणेशचतुर्थी-पासून अनंतचतुर्दशीपर्यंतच्या दहा दिवसांत मुलांना निरनिराळीं कामें करण्याची संधी मिळाली व तिचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला वर्गणी जमविणें, मखर सजविणें, मंडप शृंगारणें, फुलें-पत्री गोळा करणें फुलांचे हारगजरे तयार करणें, आरत्या म्हणणें, खिरापत तयार करणें व वांटणें, यांत मुलांच्या उत्साहाला भरपूर वाव मिळाला. त्याशिवाय रोज संध्याकाळीं व्याख्यानाच्या कार्यक्रमाच्या वेळीं, रात्रींच्या कथाकीर्तनाच्या वेळीं व्यवस्था ठेवण्याचें कामही त्यांनीं केलें. गणेशो-त्सावासाठीं मुद्दाम मुलांमुलींनीं मोठ्या मेहनतीनें ‘ स्वस्तिक मेळा ’ बसविला. त्याचे कार्यक्रमही गांवभर केले. गणपती विसर्जनाच्या दिवशींच्या मिरवणुकींत स्वस्तिक मेळा अग्रभागीं असून स्वयंसेवकांचें पथक शिस्त व शांतता राखीत बाजूनें चाललें होतें.

अनेक दिवस चालणाऱ्या धार्मिक उत्सवाप्रमाणें यात्रांच्या ठिकाणींही स्वयंसेवकांचें काम करण्याचें मुलांनीं ठरविलें. सुरवातीला त्यांनीं



चतुःशृंगीची यात्रा घेतली. नवरात्राचे नऊ दिवस तेथें देवीची यात्रा असावयाची. देवीचें देऊळ डोंगरावर असून पायथ्यापर्यंत पन्नास पाऊणशें पायऱ्या आहेत. चतुःशृंगी हें पुण्याजवळ असलेलें एक प्रेक्षणीय स्थान आहे. देवीच्या यात्रेसाठीं आजूबाजूच्या कित्येक गांवांतून हजारों लोक तेथें येतात. डोंगराच्या पायथ्याला मोठी जत्रा भरते. देवीच्या दर्शनासाठीं कोण तोबा उडतो. माणसांची किती खेंचाखेंच होते. पायथ्याशीं भरणाऱ्या जत्रेमुळें लहान मुलांचीही खूप गर्दी होते. मेवामिठाईच्या दुकानांपाशीं, लाकडी घोड्यांच्या फिरत्या चक्रापाशीं व खेळणीवाल्यांच्या दुकानांपाशीं, मुलांची कोण धांदल ! चार दोन मुलें दरवर्षी हरवायचीं व चेंगरायचीं. अशा यात्रेच्या ठिकाणीं व्यवस्था ठेवण्याची फार जरूर असते. तेंच काम सेवादलाच्या स्वयंसेवकांनीं करावयाचें ठरविलें. रोज सकाळीं गांवांतून देवीच्या नांवाचा जयघोष करीत स्वयंसेवकांचें पथक निघावयाचें. तेथें गेल्यावर निरनिराळ्या तुकड्यांनीं देवळांत, देवळाबाहेर, जाण्यायेण्याच्या वाटेवर व पायथ्याशीं भरलेल्या जत्रेंत सुव्यवस्था ठेवण्याचें काम वाटून घ्याव-याचें. यामुळें यात्रेकरूंची पुष्कळच सोय झाली. नेहमींचा गोंधळ कमी झाला व सर्वांना यात्रेचा सोहळा नीटपणें बघतां आला.

चतुःशृंगीच्या जवळच्या यात्रेंत काम करण्यांत त्यांना यश आलें. तेव्हां त्यांनीं मोठ्या दूरच्या यात्राही हातीं घेण्याचा निश्चय केला. मोठ्या मंडळींच्या मदतीनें त्यांनीं आळंदीची यात्रा, देहूची यात्रा, महाशिव-रात्रीची पाषाणची यात्रा, या वेळीं त्या त्या ठिकाणीं जाऊन थोडेंथोडें स्वयंसेवकांचें काम करण्यासाठीं कंबर बांधली. मुलांच्या वयाच्या व शक्तीच्या मानानें पाहातां हें काम खरोखर त्यांच्या आवाक्याबाहेरचें होतें. परंतु त्यांचा उत्साह दांडगा, उमेद विलक्षण व त्या जोरावर त्यांनीं हेंही काम करण्याचें ठरविलें. त्यांच्या कामाचें यशापयश पाहावयाचें नाहीं. त्यांचा उत्साह व काम करण्याची हौस यांचें कौतुक करावयाचें !

मोठ्या यात्रेच्या ठिकाणीं हीं चिमुरडीं मुलें काय करूं शकणार? या चिमुरड्या स्वयंसेवकांना कोण दाद देणार? त्यांच्या मार्गांतील या अडचणींची त्यांना जाणीव नव्हती असें नाहीं. त्यांना यांत फार यश येणार नाहीं हेंहीं त्यांना माहीत होतें. परंतु त्यांचा प्रयत्न हेंच त्यांचें यश! त्यांचा उत्साह हें त्यांचें पारितोषिक! त्यांनीं केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांना समाधान वाटलें. इतर लोकांनीं त्यांचें आनंदानें कौतुक केलें. 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' असें म्हणतात; मुलांच्या सध्याच्या प्रयत्नांत त्यांच्या भविष्यकालीन यशाचीं चिन्हें स्पष्टपणें दिसत होतीं. सार्वजनिक सेवेच्या बीजारोपणाचा तो काळ होता. या बीजालाच पुढें अंकुर फुटावयाचे आणि सुंदर सुंदर फुलें व फळें यावयाचीं.

---

**अभ्यास :** (१) उत्सवांत काम करण्याचा मुलांच्या वागणुकीवर काय परिणाम झाला? (२) धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय उत्सव यांतील फरक उदाहरणें देऊन स्पष्ट करा. (३) 'देशासाठीं व देवासाठीं' ह्या ब्रीद वाक्याचा अर्थ काय? (४) रामनवमीच्या उत्सवाच्या वेळीं सेवादलानें कोणती कामगिरी बजावली? (५) गणेशोत्सवाच्या वेळीं मुलांनीं कोणकोणतीं कामें केलीं? (६) चतुःशृंगीची यात्रा केव्हां भरते? (७) तुमच्या गांवीं कोणती यात्रा भरते? (८) तुम्हीं पाहिलेल्या यात्रेचें वर्णन करा. (९) यात्रेच्या ठिकाणीं बालस्वयंसेवक काय करूं शकतात? (१०) 'सार्वजनिक सेवेच्या बीजारोपणाचा काळ' म्हणजे काय?

# ११. नागरिक आणि नागरिकशास्त्र

नगर म्हणजे शहर. नगरांत राहाणारा तो नागरिक; असा नागरिक शब्दाचा मूळ अर्थ आहे. नागरिक म्हणजे शहरचा रहिवासी. शहरचा रहिवासी आणि खेडेगांवचा रहिवासी यांत फरक आहे. शहरचे लोक सुशिक्षित व सुधारलेले असतात; खेडेगांवचे लोक त्या मानानें अडाणी व मागासलेले असतात. शहरांत व खेडेगांवांत अंतर आहे. शहरांत सर्व सुखसोयी व साधनें असतात. खेडेगांवांत तीं फारशीं नसतात. शहरांत सगळीकडे शांतता व सुव्यवस्था दिसून येते. खेडेगांवांत तशी परिस्थिति नसते. केवळ शहरांत राहाणारा इतकेंच नव्हे, तर शहरांत राहण्यास योग्य अथवा लायक तो नागरिक, अशी नागरिक शब्दाची व्याख्या करतां येईल.

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे असें म्हटलें आहे आणि तें अगदीं खरें आहे. मनुष्याला एकटें राहाण्यांत आनंद वाटत नाहीं. त्याला चार मंडळींत राहाण्यांत सुख होतें. स्वतःच्या घरांतसुद्धा त्याला एकटें राहाण्याचा कंटाळा येतो. घरांतील सर्व मंडळी मिळून कुटुंब होतें. गांवांतील सगळ्या कुटुंबांचा मिळून समाज तयार होतो. समाज म्हणजे निरनिराळ्या व्यक्तींचा समुदाय. सुव्यवस्थित व सुसंघटित समुदाय! ज्यांचे परस्परसंबंध स्नेहाचे व सहकार्याचे राहूं शकतात अशा सुशिक्षित व समंजस माणसांचा समुदाय! अशिक्षित अडाणी माणसांच्या समुदायाला समाज म्हणतां येणार नाहीं. शिक्षणप्रसाराशिवाय समाज निर्माण होणें शक्य नाहीं व समाज असल्याशिवाय शहरचें सुखकर व प्रगतिपर जीवन शक्य नाहीं.

शहरची ही सुधारणा, सुव्यवस्था व हें सौख्य सरकार व समाज यांच्यामधील पूर्ण सलोखा व सहकार्य यांवर अवलंबून आहे. सरकार म्हणजे राज्यव्यवस्था बघणारे अधिकारी. हल्लींच्या लोकशाहीच्या काळांत

सरकार हें लोकांच्या प्रतिनिधींचेंच बनलेलें असतें. आपल्या देशांत आतां राजकीय स्वातंत्र्य आहेच आणि शिवाय स्थानिक स्वराज्य आहे. सरकार कायदे करतें, कर बसवितें. समाज म्हणजे शहरांतील सर्व लोक अथवा नागरिक. नागरिकांना जसे सनदशीर हक्क आहेत तशा त्यांना कायदेशीर जबाबदाऱ्या आहेत. शहरचा कारभार करण्यास लायक अशा प्रतिनिधींची निवड करणें व गांवच्या कारभाराबद्दल वर्तमानपत्रांतून अथवा सभा भरवून तक्रारींची दाद लावून घेणें, लोकमत व्यक्त करणें व सर्व बाबतींत शक्यतों लोकमताला मान देण्यास भाग पाडणें हे हक्क आहेत. उलट, सरकारी कायदे योग्य रीतीनें पाळणें व कर देणें या त्यांच्या जबाबदाऱ्या आहेत. नागरिकानें आपले हक्क योग्य रीतीनें बजावले पाहिजेत, त्याचप्रमाणें त्यानें आपल्या जबाबदाऱ्याही योग्य तऱ्हेनें पार पाडल्या पाहिजेत.

नागरिकाचे हे हक्क व जबाबदाऱ्या हीं त्याचीं कर्तव्यें होत. हीं कर्तव्यें चार प्रकारचीं आहेत असें म्हणतां येईल. तीं येणेंप्रमाणें : ( १ ) त्याचें स्वतःविषयींचें कर्तव्य, ( २ ) त्याच्या कुटुंबाविषयीं अथवा घरच्या मंडळींविषयीचें कर्तव्य, ( ३ ) त्याचें समाजविषयक कर्तव्य, ( ४ ) त्याचें सरकारविषयक कर्तव्य. या निरनिराळ्या कर्तव्यांची त्याला जाणीव करून देणारें व तीं कर्तव्यें त्यानें कशा रीतीनें पार पाडावींत हें शिकविणारें शिक्षण तें नागरिक-शिक्षण. या विषयाची व्यवस्थित मांडणी, सांगोपांग चर्चा अथवा मुद्देसूद विवेचन हें नागरिकशास्त्र !

सर्व शिक्षणाचा अंतिम हेतु शरीरसंपन्न व शीलसंपन्न नागरिक तयार करणें हाच असल्याचें दिसून येईल. या दृष्टीनें नागरिक-शिक्षणाचें महत्त्व किती आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. आपणांपैकीं पुष्कळ शहरांत राहातात. समाजांत वावरतात. खेडेगांवसुद्धा आतां पूर्वीसारखें राहिलें नाहीं. तेथेंही हळूहळू शिक्षणप्रसार व सुधारणा होत आहे. सर्व बाबतींत

शहराचें अनुकरण होऊं लागलें आहे; तेव्हां नागरिक-शिक्षण सर्वांनींच घेणें आवश्यक आहे. नागरिक-शिक्षण हेंच खरें शिक्षण. नागरिक शिक्षण हें सर्व शिक्षणाचें सार आहे असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. नागरिक-शिक्षणास अथवा नागरिक-शास्त्रास नागरिक-नीति असेंही म्हणण्याचा प्रघात आहे. असें म्हणण्यांत गैर असें कांहींही नाहीं. कारण नागरिक शिक्षण म्हणजे उत्तम उत्तम नीतितत्त्वांचेंच शिक्षण! खरें बोलणें, प्रामाणिकपणें वागणें, स्वतंत्रपणें विचार करणें, मनोधैर्य दाखविणें, इतरांविषयीं स्नेह व सहानुभूति बाळगणें; त्यांच्याशीं सहकार्य करणें हेच नागरिकांच्या अंगीं लागणारे आवश्यक गुण आणि हीच नीति-शास्त्राचीही शिकवण. नागरिक-शास्त्र व नीतिशास्त्र यांचें ध्येय एकच व तें म्हणजे सुस्वभावी व शीलसंपन्न स्त्रीपुरुष निर्माण करणें. 'एकमेकां करूं साहाय्य । अवघे धरूं सुपंथ' हाच नागरिकधर्म व हीच नागरिकनीति! यांतच व्यक्तीचें हित व समाजाचें कल्याण आहे.

बालपण हा पुढील आयुष्याचा पाया आहे. मुलांचें बालपण जसें जाईल त्यावरून त्यांचें पुढील आयुष्य कसें होईल याचा अंदाज बांधतां येतो. स्वभाव एकदा बनला, कीं तो बदलत नाहीं! आणि स्वभाव हा सवयीनींच बनतो; आणि सवयी बऱ्या अथवा वाईट—या लहानपणींच लागतात. आणि म्हणूनच मुलांची लहानपणीं फार काळजी घेतली पाहिजे. त्यांना चांगल्या सवयी लागतील व वाईट सवयी लागणार नाहींत अशी खबरदारी घेतली पाहिजे. त्यांच्या मनावर चांगले संस्कार होतील अशी व्यवस्था केली पाहिजे. शरिराच्या स्वच्छतेपासून तों समाजसेवेच्या पहिल्या प्रयत्नापर्यंतच्या सर्व गुणांची बुद्धिपुरस्सर जोपासना लहानपणापासून केली गेली पाहिजे. मुलांचें लक्ष त्यांकडे जाणून बुजून वेधलें पाहिजे. चांगल्या सवयींचे फायदे व वाईट सवयींचे तोटे त्यांच्या नजरेस आणले पाहिजेत. बऱ्यावाईटांतला

फरक त्यांना ओळखावयास शिकविला पाहिजे. मोठ्या माणसांप्रमाणें मुलांनाही एकटें राहावयास आवडत नाहीं. त्यांनाही चार चौघांत राहावें, खेळावेंसें वाटतें. याच प्रवृत्तीला योग्य वळण लावलें पाहिजे. नागरिक-शास्त्राचा अभ्यास मोठेपणीं झाला तरी चालेल, परंतु नागरिकगुणांचा विकास मात्र लहानपणापासून व्हावयास पाहिजे. सर्व शिक्षणाची परिणति मोठेपणीं होत असली तरी शिक्षणाची सुरुवात लहानपणींच होत असते. आजचीं लहान मुलें हेच उद्यांचे नागरिक; किंबहुना लहान लहान मुलें हीं बाल-नागरिक व मोठीं माणसें प्रौढ-नागरिक असेंही म्हणतां येईल. खरोखर पाहातां नागरिक-शिक्षण हें लहानपणापासून चालू असतें. आपलें तिकडे लक्ष असतें कीं नाहीं एवढाच प्रश्न आहे. मोठ्या माणसांचें, घरच्या वडील मंडळींचें अथवा शाळेंतील शिक्षकांचें व मुलांचें तिकडे लक्ष वेधावें हाच नागरिक-शिक्षण मुलांना देण्यांत हेतु. उपदेशापेक्षां उदाहरण अधिक परिणामकारक! लहान मुलांच्या बाबतींत हें अधिकच लागू पडतें. पुस्तकी माहितीपेक्षां प्रत्यक्ष कृतिद्वारें शिकविलेलें त्यांना लवकर समजतें व त्यांच्या मनावर कायमचें ठसतें. मुलांचें सर्वच शिक्षण अशा रीतीनें झालें पाहिजे. घर ही नागरिकशिक्षणाची प्राथमिक शाळा आहे. शालेय पंचायत अथवा मुलांचा समाजसेवासंघ ही नागरिक शिक्षणाची छोटी प्रयोगशाळा होय! या पाठशाळेंत जे शिकतील व प्रयोगशाळेंत जे काम करतील ते मोठेपणीं सार्वजनिक कार्य व समाजसेवा करतील यांत काय संशय!

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २६६३९ नों. दि. १०/८/७८
वि. बा. बा.